दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष – ५ वे | अंक –३५७ | शनिवार,दि.३० ऑगस्ट २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४
Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-357 | Saturday, Dt.30 August 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# मनोज जरांगे पाटलांची मुंबईत सरकारवर तोफ:म्हणाले- हे सरकार इंग्रजांपेक्षाही वाईट, मुख्यमंत्र्यांना आमच्या वेदना कळत नाहीत

मुंबई /प्रतिनिधी

मनोज जरांगे पाटील यांचे मुंबईत आंदोलन सुरू असून आणखी एक दिवसाची परवानगी देण्यात आली आहे. राज्यभरातून लाखो मराठे मुंबईत दाखल झाले आहेत. मनोज जरांगे पाटलांच्या उपोषणाला आज सायंकाळी ६ पर्यंतची वेळ होती. परंतु आणखी एक दिवसाची मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर मनोज जरांगे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना तूफान फटकेबाजी केली.

मनोज जरांगे म्हणाले, इंग्रजांपेक्षा हे सरकार बेकार. सरकारने भंगार खेळ खेळणे बंद करा, असली खेळ खेळा. सरकारने जेवण आणि पाणी मिळू दिले नाही. सरकार आडमुठे गेले तर मराठे आडमुठे घुसणार. एक एक दिवसाची रडक्यासारखी परवानगी दिली. तुम्ही आमच्या जिल्ह्यात आल्यावर अशी वागणूक देतो का? तुम्ही आम्हाला मुंबईत अशी वागणूक दिली न फडणवीस साहेब तर आमच्याकडे आल्यावर आम्ही पण तुम्हाला त्रास देणार. कशाला त्या लफड्यात पडता?

### मराठ्यांच्या पोरांशी वाईट वागू नका

पुढे बोलताना मनोज जरांगे म्हणाले, तुमचे खरे आणि आमचे खरे नाही, असे कसे होऊ शकते? आमचे मराठ्याचे पोरं चावतेत का रस्त्याने चालताना? तुमच्या दारात आलो तर एक एक दिवसाची परवानगी देता, काय राव? २७ तारखेला सकाळी पण जेवलो नाही, तसाच पुढे निघालो. २८ ला सकाळी जेवलो ते पण थोडेच जेवलो आणि त्यात मी जागाच होतो. मला हे सरकारला सांगायचे आहे की मराठ्यांच्या पोरांशी वाईट वागू नका, गरिबाचे लेकरे आहेत ते. आमचे लोक माज घेऊन नाही आले इकडे. आमच्या पोरांचे खूप हाल आहेत, तुम्हाला नाही कळणार मुख्यमंत्री साहेब. तुम्हाला आमचे वेदना कळत नाही.

### एकाचे काढून दुसऱ्याला आम्ही मागतच नाही

मनोज जरांगे पाटील पत्रकारांच्या प्रश्नांचे उत्तर देताना म्हणाले, या सरकारला मराठ्यांच्या पोरांचे भले होऊ द्यायचे नाही. त्यांना मराठा समाजाचे वाटोळे करायचे आहे म्हणून कोणी चर्चेला आले नाही. एक दिवसाची परवानगी देऊ शकतात तर कायमस्वरूपी परवानगी सरकार देऊ शकते. सरकार असून खूप चुकीचे करत आहेत. त्यांनी गैरसमज पसरवण्याचे काम केले आहे. एकाचे काढून दुसऱ्याला आम्ही मागतच नाही, हे सरकारचे काम आहे.



## खूप मोठ्या संख्येने मराठे मुंबईत येणार आहेत

मी बलिदान द्यायला तयारच झालो आहे, पण तुम्ही आमच्या मराठ्यांच्या पोरांसाठी दुकाने बंद करू नका. नाहीतर जशास तसे होणार. पोरांनो तुम्ही कुठेही गेले तरी संयम पाळा. आपापल्या गाड्या व्यवस्थित मैदानावर जाऊन लावा. तिथून इथे मैदानात येता येईल. चेंबूरच्या मैदानावर गाड्या लावा. पार्किंगची जबाबदारी सरकारची आहे. सरकारने नाही ऐकले तर आणखी खूप मोठ्या संख्येने मराठे मुंबईत येणार आहेत. मी खोटे सांगत नाही. तुम्ही जेवढा विलंब कराल तेवढे मराठे मुंबईमध्ये येत राहणार. आम्ही लोकशाहीचा आणि शांततेचा मार्ग सोडणार नाही. तुम्ही गोळ्या घातल्या तरी मी त्याला तयार आहे, तुम्ही जे कराल त्यासाठी मी तयार आहे. माझ्या मागण्या तुम्हाला माहीत आहे, आता पुन्हा सांगणार नाही.

## आता फायनल फाईट होणार

ओबीसी १६ टक्के आरक्षण खातात. ओबीसीला ३२ टक्के त्यातले २० टक्के कमी करा आणि आम्हाला द्या असे आम्ही म्हणालो का? आमच्या नोंदी आहेत त्यातले आरक्षण मागत आहोत. आता महाराष्ट्राला सगळे कळले आहे. आपल्या सरकारी नोंदी आहेत, आपण कोणाचे घेत नाही. हे ओबीसी लोकांना पण माहीत आहे, काही लोक सोडले तर. आता फायनल फाईट होणार. आरक्षण होणार नाहीतर मी तरी उपोषण करून मरणार. त्यांच्या आडमुठेपणामुळे केंद्र सरकारलाही दाग लागणार आहे, असेही जरांगे म्हणाले.



## ५ सप्टेंबर रोजी दैनिक समर्थ राजयोगच्या उत्कृष्ट प्रतिनिधींना पुरस्काराचे वितरण

**शेख आयेशा,सुनील शिरसाट, चंद्रकांत पाटील,शेख अब्दुल, अमोल कापसे, शंकर झाडे आणि शेख फारूक पहिल्या पुरस्काराचे मानकरी !**

बीड /प्रतिनिधी

दैनिक समर्थ राजयोगच्या सहाव्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून शुक्रवार दिनांक ५ सप्टेंबर २०२५ रोजी मान्यवरांच्या शुभहस्ते दैनिक समर्थ राजयोग मध्ये मागील कालावधीमध्ये उत्कृष्टरित्या काम करणाऱ्या मान्यवर प्रतिनिधींचे आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर उत्कृष्ट प्रतिनिधी २०२५ या सन्मानाच्या पुरस्काराने उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानचिन्ह, सन्मानपत्र देऊन गौरविण्यात येणार असल्याचे संपादक वैभव स्वामी यांनी जाहीर केले आहे.

दैनिक समर्थ राजयोगचा वर्धापन दिन प्रतिवर्षी विविध क्षेत्रातील शिक्षकांना राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार देऊन साजरा केला जातो. या उपक्रमामध्ये यावर्षी

(उर्वरीत पान २ वर)

## पट्टीवडगाव गटात सेवानिवृत्त मुख्याध्यापक सायस गित्ते यांच्या नावाची जि.प निवडणूकीसाठी जोरदार चर्चा

परळी (प्रतिनिधी) :-

जिल्हा परिषद व पंचायत समितीचे निवडणुकीचे बिगुल वाजले असून परळी विधानसभा मतदार संघातील पट्टीवडगाव गटात सेवानिवृत्त मुख्याध्यापक सायस गित्ते यांच्या नावाची जि.प निवडणूकीसाठी जोरदार चर्चा होत आहे. गटात आपला माणूस कामाचा माणूस अशी सर्व सामान्य मतदार मोठ्या उत्सहात सायस गित्ते यांच्या नावाची चर्चा जोर धरू लागली आहे. सायस गित्ते हे एक अनुभवी व्यक्तिमत्व आहेत गित्ते हे चांगल्या पद्धतीने आपल्या गटात चांगले काम करतील अशी चर्चा जनता करत आहे.



जिल्हा परिषद व पंचायत समीती गट व गणासाठी अंतिम रचना जाहिर झाली असून आता फक्त आरक्षण कधी जाहीर होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आगामी काळात होऊ घातलेल्या जिल्हा परीषद आणि पंचायत समिती निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर सुशिक्षीत, सुसंस्कृत,आणि सर्व जातीधर्मातील

(उर्वरीत पान २ वर)

**ABHIMAN URBAN MULTIPURPOSE NIDHI LIMITED**
**REGD OFF: H.NO 1-3-2821 C/O KALYAN DADARAO GHODKE TIRUPATI NAGAR, BID, BEED, MAHARASHTRA, INDIA, 431122**
**CIN: U65990MH2019PLC323353 Email: abhimanurban@gmail.com**

**PUBLIC NOTICE**

**(Pursuant to section 20 read with Section 96 and Section 101 of the Companies Act, 2013)**

NOTICE is hereby given that the 6th Annual General Meeting of the Members of ABHIMAN URBAN MULTIPURPOSE NIDHI LIMITED will be held on Tuesday, the 30th day of September, 2025 at 11:00 AM at the registered office of the company situated at: H NO 1-3-2821 C/O KALYAN DADARAO GHODKE TIRUPATI NAGAR, BID, BEED, MAHARASHTRA, INDIA, 431122 to transact the following business:

**ORDINARY BUSINESS:**
1. To consider and adopt the Financial Statements and Board Report with annexure for 31/03/2025. 2. To consider retirement by rotation of Director and re-appointment thereof.
3. To consider Appointment of Statutory Auditor of the Company.

**SPECIAL BUSINESS:**
**To consider and if thought fit to pass the following resolutions:**
4. To consider and approve the increase in Authorized share capital of the Company.
5. To consider and approve Directors remuneration.

A copy of notice along with the explanatory statement is affixed on the notice Board of the Company. The same can be delivered to the member on request and payment of fees. In case of any queries, members may contact registered office of the Company.

**BY ORDER OF THE BOARD OF DIRECTORS**
**FOR ABHIMAN URBAN MULTIPURPOSE NIDHI LIMITED**
SD/-
YASHRAJ GHODKE
DIRECTOR
DIN: 09445965
PLACE. BEED

**NOTES:**
• A member entitled to attend and vote is entitled to appoint a proxy to attend and vote instead of himself and the proxy need not be a member of the company.
•Proxies in order to be effective must be lodged with the company at its registered office at least 48 hours before the time appointed for the meeting

# माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील अधिकाऱ्यांना पदोन्नती

**बीडचे तत्कालीन माहिती अधिकारी किरण वाघ वरिष्ठ सहाय्यक संचालक मुंबईपदी तर बीडच्या विद्यमान माहिती अधिकारी अंजू निमसरकर आता गोंदियाच्या जिल्हा माहिती अधिकारी**



बीड/ प्रतिनिधी

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील सहायक संचालक (माहिती) माहिती अधिकारी अधिपरिक्षक, पुस्तके व प्रकाशने यांना वरिष्ठ सहायक संचालक श्रेणी (माहिती), जिल्हा माहिती अधिकारी, वरिष्ठ उपसंपादक, जनसंपर्क अधिकारी या पदावर पदोन्नती देण्यात आल्या आहेत. यामध्ये बीडचे तत्कालीन माहिती अधिकारी किरण वाघ यांची आता वरिष्ठ सहायक संचालक (माहिती) मुख्यालय मुंबई येथे पदोन्नतीवर संधी मिळाली आहे तर बीडच्या विद्यमान माहिती अधिकारी अंजू निमसरकर यांची गोंदिया जिल्ह्याचे जिल्हा माहिती अधिकारी म्हणून पहिल्यांदाच संधी मिळाली आहे. त्यांना पुढील यशस्वी कार्यकाळासाठी दैनिक समर्थ राजयोग परिवाराच्यावतीने मनःपूर्वक शुभेच्छा.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय विभागाअंतर्गत पदोन्नतीच्या कोट्यावरील ५ रिक्त पदांवर तात्पुरत्या नियमित पदोन्नतीचे विवरणपत्र शासन आदेशानुसार २७ ऑगस्ट रोजी जाहीर करण्यात आले आहे. या पदोन्नतीमध्ये बीडचे तत्कालीन माहिती अधिकारी श्री. किरण रामकुष्ण वाघ,माहिती

(उर्वरीत पान २ वर)

## मराठवाड्यात ढगफुटी सृदृश्य पाऊस, अनेक गावांचा संपर्क तुटला, सरकार सर्वोतपरी मदत करणार, मुख्यमंत्र्यांचं आश्वासन

राज्याच्या विविध भागात जोरदार पाऊस कोसळत आहे. विशेषत: मराठवाड्यात पावसानं धुमाकूळ घातला आहे. नांदेड आणि बीड जिल्ह्यात मोठा पाऊस झाला आहे. नांदेड तालुक्यातील सोमेश्वर रहाटी जैतापूर परिसरात दोन दिवसापासून मुसळधार पाऊस सुरु आहे. आज पहाटे ढगफुटी झाल्यानं नांदेडकडे जाणारा राहाटी पुलावरुन पाणी वाहत होते. त्यामुळं नांदेड ते सोमेश्वर जैतापूर रहाटी या गावाचा संपर्क तुटला



आहे. यावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. प्रशासन योग्य रितीने सर्व परिस्थिती हाताळत आहे. सर्व काही नांदेडमध्ये केलं जात आहे. राज्य सरकार सर्वोतपरी मदत करेल असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले आहे.

नांदेडमध्ये मोठा पाऊस झाला आहे. मी तेथील प्रशासनाच्या संपर्कात असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. वरील धरणातून पाणी

(उर्वरीत पान २ वर)

## संपादकीय

# भाषा मरता देशही मरतो...

भाषा आणि संस्कृतीचा विकास एकमेकांवर अवलंबून असतो. पण आज भाषेवरून संघर्ष वाढतोय. महाराष्ट्रात स्थलांतरित झालेल्या परप्रांतीयांनी इथे एकरूप न होता स्वतःचे शक्तिस्थान निर्माण केले आहे. सरकार आणि राजकारण्यांच्या भूमिकेमुळे हा वाद अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

भाषा आणि संस्कृतीचा विकास एकमेकांवर अवलंबून असतो. पण आज भाषेवरून संघर्ष वाढतोय. महाराष्ट्रात स्थलांतरित झालेल्या परप्रांतीयांनी इथे एकरूप न होता स्वतःचे शक्तिस्थान निर्माण केले आहे. सरकार आणि राजकारण्यांच्या भूमिकेमुळे हा वाद अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

मानवी उत्क्रांती होत गेली, तसतसा भाषेचाही विकास होत गेला. भाषा हे व्यवहाराचे आणि संवादाचे साधन आहे. संवादातून संस्कृतीचा विकास होत असतो आणि यातूनच भाषा आणि संस्कृती उत्तरोत्तर वृद्धिंगत होत गेल्या. मात्र, गेल्या काही काळापासून भाषेवरून प्रांतिक, प्रादेशिक संघर्ष तीव्र होताना दिसतोय. भाषेचा वाद तसा जुनाच आहे. भाषेवर आधारित प्रांतरचना झाल्यामुळे विविध भाषिक राज्ये अस्तित्वात आली आणि त्यातून प्रादेशिक, सांस्कृतिक विकास होत गेला. स्वातंत्र्यानंतर दक्षिणेकडील राज्यांसह, महाराष्ट्राने व इतर काही राज्यांनी लक्षणीय प्रगती केली. पण, धार्मिक रूढी-परंपरेत अडकलेल्या उत्तरेकडील राज्यांना विकासाची गुढी उभारता आली नाही. यामुळे उत्तरेकडील लोकांचा एक मोठा लोंढा महाराष्ट्र आणि इतर विकसित राज्यांकडे स्थलांतरित होत राहिला.

महाराष्ट्र राज्य भारतीय उपखंडात दक्षिण-मध्य भागात येते. भौगोलिकदृष्ट्या हे राज्य उत्तर आणि दक्षिण भागाला जोडत असल्यामुळे दोन्हीकडील लोक महाराष्ट्रात, विशेषतः महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबईत, स्थलांतरित होत गेले. नोकरी, उद्योग-व्यवसायासाठी हे स्थलांतर होत असल्यामुळे ही संख्या लक्षणीय वाढली. परप्रांतातून आलेल्या व्यापाऱ्यांनी, व्यवसायिकांनी आणि नोकरदारांनी स्थानिकांसोबत येथील भाषा, संस्कृती शिकून इथल्या मातीशी आणि समाजजीवनाशी एकरूप व्हायला पाहिजे होते. दुधातील साखरेसारखे एकजीव व्हायला हवे होते. पण तसे झाले नाही.

महाराष्ट्रातील सद्यस्थिती पाहता असे दिसते की, वर्षानुवर्षे महाराष्ट्राच्या मातीत नोकऱ्या, धंदा, रोजगार आणि राजकारण करणाऱ्यांना येथील भाषा, संस्कृती, संस्कार शिकून महाराष्ट्राच्या मातीशी एकरूप व्हायचेच नाही. त्यांना व्यवसायाबरोबर राजकारण आणि स्वतःचे शक्तिस्थान तयार करायचे आहे. येथे आलेल्या व्यापाऱ्यांना, उद्योजकांना, हिंदी कलाकारांना मराठी येत नाही. किंबहुना, त्यांना ती शिकायचीच नाही, अशीच परिस्थिती आहे.

हिंदीशी साधर्म्य असल्यामुळे देवनागरी लिपीतील मराठी भाषा शिकणे खूप सोपे आहे. त्या त्या प्रांताची भाषा शिकणे हे संवाद आणि संस्कृतीचे साधन आहे. त्या प्रांताप्रती अभिमान-स्वाभिमान व्यक्त करण्याचेही ते एक साधन आहे. पण, जर हे करायचे नसेल तर अहंकार तयार होतो आणि आक्रमक मानसिकता वाढते. 'काय फरक पडतो, कोण आमचे वाकडे करू शकतो?' अशी दर्पोक्तीची भाषा सुरू होते आणि इथूनच भाषिक-प्रादेशिक संघर्ष सुरू होतो. म्हणूनच, सरकार पुरस्कृत मराठी-हिंदी भाषेचा आणि त्याआडून मराठी विरुद्ध इतर प्रांतीय अशी मतांची विभागणी सुरू आहे. ही खूप गंभीर बाब आहे. महापालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जशा जवळ येतील, तसा हा वाद अधिक तीव्र केला जाईल.

हिंदी ही एक 'आक्रमणकारी' भाषा आहे. हिंदी आणि हिंदी भाषिकांच्या रेट्यामुळे देशातील बहुतेक राज्यांमध्ये प्रांतवाद उफाळून आला आहे. निशिकांत दुबेसारखा एका राष्ट्रीय पक्षाचा प्रवक्ता आणि खासदार जेव्हा मराठी माणसाला 'पटक पटकके मारेंगे' असे म्हणतो, तेव्हा ते या भाषिक वादाला द्वेषाची फोडणीच देत असतात.


# जाफ्राबादच्या ४०० वर्षांचा किल्ला दुर्दशेत पुरात्व विभागाच्या निष्काळजीपानामुळे इतिहासिक वारसावर संकट

जाफराबाद तालुका ( प्रतिनिधि )

जाफराबाद शहराचे पूर्णा व केलना नद्यांच्या पवित्र संगमावर उभारलेला जाफ्राबादचा ऐतिहासिक किल्ला आज आपला चारशे वर्षांचा वारसा जपताना अक्षरशः हळूहळू ढासळत आहे. पुरातत्त्व विभागाच्या निष्काळजीपणामुळे या किल्ल्याची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत असून, शहरातील नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

ऐतिहासिक पार्श्वभूमी

सुमारे चार शतकांपूर्वी मोहम्मद हुसेन ऊर्फ अकीदत्त बक्षी यांच्या मार्गदर्शनाखाली या किल्ल्याचे बांधकाम करण्यात आले. निजामशाही व मोगल साम्राज्याचा इतिहास जतन करणारा हा किल्ला आज जाफ्राबाद शहराची ओळख आहे. तत्कालीन




मोगल सत्ताधाऱ्यांनी बुरहानपूरच्या सुबेदाराच्या सुरक्षेसाठी या किल्ल्याचे बांधकाम केले, असे ऐतिहासिक संदर्भ आढळतात. दिल्ली दरवाजा, मदार दरवाजा, खिडकी दरवाजा आणि पाणी दरवाजा ही या किल्ल्याची प्रमुख वैशिष्ट्ये होती. दिल्ली दरवाज्यावर आजही मोगल बादशहा शाहजहांनी दिलेला फतवा कोरलेला दिसतो; मात्र काळाच्या ओघात हे अक्षरशः मिटून जात आहे.

दुर्दशेचे चित्र


आज या किल्ल्याच्या भिंतींवर जंगली झाडांची वाढ झालेली असून, किल्ल्याभोवती काटेरी झुडपांचे साम्राज्य पसरले आहे. किल्ल्यातील दरवाजे भग्नावस्थेत आहेत. निजामकालीन विश्रांतीगृहाच्या देखभालीअभावी ते सुद्धा उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे. एकेकाळी किल्ल्यात असलेल्या सात तोफा 'मच्छी तोफ' म्हणून प्रसिद्ध होत्या. यातील काही तोफा सजावटीसाठी छत्रपती संभाजीनगर येथे नेण्यात आल्या, तर काहींचा पत्ताच लागलेला नाही.

नागरिकांचा संताप

स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, जाफ्राबाद शहराला ऐतिहासिक वारसा लाभला असून हा किल्ला पर्यटकांसाठी आकर्षणाचे ठिकाण होऊ शकतो. मात्र, पुरातत्त्व विभागाच्या उदासीनतेमुळे आजही तो पर्यटन स्थळांच्या यादीत समाविष्ट झाला नाही. किल्ल्याच्या दुरुस्तीबाबत अनेक वेळा आवाज उठवला गेला, पण त्याकडे कानाडोळा केला जातो. वेळेत दुरुस्ती न झाल्यास हा किल्ला कोसळण्याची भीती आहे, असे नागरिकांचे म्हणणे आहे.

निष्कर्ष

जाफ्राबाद शहराला ऐतिहासिक वारसा लाभलेला असताना त्याची उपेक्षा होणे ही दुर्दैवी बाब आहे. किल्ला व त्याच्या परिसराचे जतन केले गेले, तर भविष्यात हे ठिकाण एक महत्त्वाचे पर्यटन केंद्र ठरू शकते. अन्यथा काही वर्षांत हा वारसा केवळ कागदोपत्री इतिहासात उरण्याची भीती व्यक्त होत आहे.



# पत्रकार रविंद्र राऊत ची कन्या धनश्री एमबीबीएस पात्र

माजलगाव(प्रतिनिधी)येथील पत्रकार तथा दस्तऐवज लेखक रविंद्र मधुकर राऊत यांची कन्या धनश्री रविंद्र राऊत रा.कवडगाव(बु)ता.वडवणी ह.मु.अशोकनगर,माजलगाव हि एमबीबीएस डॉक्टर च्या शिक्षणासाठी पात्र झाली आहे. गुणवत्ते नुसार शासकीय कोट्यातून कु.धनश्री राऊत हि बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयात गुणवत्तेनुसार प्रवेशपात्र ठरली ही निश्चितच अभिमानाची बाब आहे. तसेच तीचे मुळगाव कवडगाव(बु) ता.वडवणी येथील चार विद्यार्थी वैद्यकीय शिक्षण घेत आहेत तर याच गावातील पोलीस खात्यात २०ते २२ युवक कार्यरत आहेत.धनश्री राऊतने अतिशय मेहनतक,जिद्द, चिकाटीने स्वयं अध्ययनातून तिने हे यश मिळविले आहे. तिने दहावीपर्यंत मॉडेल इंग्लिश स्कुल,माजलगाव येथे शिक्षण पूर्ण केले तर बारावीचे शिक्षण लोकनेते सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव येथे पुर्ण केले.हे यश मिळाल्याने तिचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे तर पुढील यशस्वी वाटचाली करीता सुधाकर देशमानेसर,डॉ.स्वराज देशमाने व कुटुंबियांकडून शुभेच्छा देऊन सत्कार करण्यात आला.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. आर. ए. मिसाळ यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ६३२ /२०२५**
बीबी छोटेमियाँ मनियार विरुध्द निरंक
(मार्फत ए. के वावरे गेवराई)

ज्याअर्थी मयत नामे छोटेमिया पि. बालसाहेब मनियार हे/हया दिनांक. २० / २ / २००३ रोजी मौजे बागपिंपळगाव ता गेवराई जि. बीड येथे मयत झाल्या/ झाले आहेत. अर्जदर १. बीबी प्र. मोटेमिया मनियार वयः ८७ वर्षे धंदा घरकाम रा. बागपिंपळा, ता. गेवराई, जि. बीड २. अफसर पि.गोटेमिया मनियार वय: ४९ वर्षे चंदा: शेती रा. बागपिंपळागाव ता. गेवराई जि. बीड शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार व गैरअर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार व गैरअर्जदार यांना सदर मयत नामे छोटेमिया पि. बालसाहेब मनियार यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २३/०७/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख २८/०८/२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

**शिक्का**

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/४६०
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :-०५/०८/२०२५

## कार्यालय नगर परिषद, अंबड

अर्जदार श्री./सौ.श्रीमती :- प्रमिता विलास गिरी

प्रकरण :- सर्व्हे नं.-३५ सहान प्लॉट नं.-१६ सिटी सर्व्हे नं.-१८६४/ब/१६ चे हस्तांतर करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र.(-------------) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला ------------------- येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासून (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा.नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

**चतु:सिमा:**
पुर्व :- प्लॉट नं.-२१
पश्चिम :- १२ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
दक्षिण :- प्लॉट नं.-१७ मधील भाग
उत्तर :- याच प्लॉट नं.-१६ मधील भाग

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद,**
**अंबड**



# संस्कार विद्यालय येथे दम दमा दम दम सांस्कृतिक नृत्य स्पर्धा संपन्न

बीड /प्रतिनिधी

संस्कार विद्यालय येथील श्री गणेश चतुर्थी निमित्त दम दमा दम दम सांस्कृतिक नृत्य स्पर्धा घेण्यात आले, यामध्ये तिसरी व चौथी च्या विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदवण्यात आला होता आज तिसरी वर्गातील अनुजा विशाल वडमारे हिने उत्कृष्ट नृत्य केल्याबद्दल मुख्याध्यापिका , प्राध्यापक यांनी अनुजा चे कौतुक केले, सर्व स्पर्धक विद्यार्थी विद्यार्थ्यांचे कौतुक केले, नृत्य स्पर्धा हे मोठ्या उत्साहात संपन्न झाले यावेळी, शाळेचे, श्रीमती कुलकर्णी एस डी मुख्याध्यापिका

श्री. गिरी एस डी विभाग प्रमुख तिसरी चौथी विभाग,श्रीमती जाधव एम ए,श्रीमती सौंदत्तीकर एस बी,श्रीमती पाठक व्ही आर,श्रीमती मगर व्ही व्ही,श्रीमती मोराळे एस ए,श्रीमती ठाकूर व्ही पी,श्रीमती पानखडे व्ही आर,श्री.वळवी आर जी,श्रीमती साळुंके जे बी,श्री.कांबळे ए.एल,श्रीमती काळे एस पी,श्रीमती माने एस डी,श्रीमती कौंढाण्य,यांच्या उपस्थितीत नृत्य स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-९४ दि.१७.०७.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान रूपेश राजु संत्रे, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | रूपेश राजु संत्रे | स्वतः | ०३.११.२००६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- / /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/४५७
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :-०५/०८/२०२५

## कार्यालय नगर परिषद, अंबड

अर्जदार श्री./सौ.श्रीमती :- १) विलास कैलास गिरी,२) प्रमिता विलास गिरी

प्रकरण :- सर्व्हे नं.-३५ प्लॉट नं.-२० सिटी सर्व्हे नं.-१८६४/ब/२० चे हस्तांतर करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र.(-------------) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला -------------------- येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासून (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा.नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

**चतु:सिमा:**
पुर्व :- ०६ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
पश्चिम :- प्लॉट नं.- १७
दक्षिण :- प्लॉट नं.-१९
उत्तर :- याच प्लॉट नं.-२० मधील ३५ चौ.मीटर क्षेत्राचा भाग

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

पान १ वरून...

**पट्टीवडगाव गटात...**

लोकांना सोबत घेऊन चालनारे सर्वसामान्यांच्या प्रश्नांची जाण असलेले पट्टीवडगाव गटात सेवानिवृत्त मुख्याध्यापक सायस गित्ते यांच्या नावाची जि.प निवडणूकीसाठी जोरदार चर्चा व यांना पक्षाने संधी द्यावी जेणेकरुन जनसेवेची संधी मिळेल अशी मागणी होत आहे. सायस गित्ते हे परळी विधानसभा मतदार संघाचे लोकप्रिय आ. धनंजय मुंडे साहेब यांचे विश्वासू म्हणून ओळख आहे. सामाजिक व शिक्षण क्षेत्रात मोठे योगदान आहे. सर्व समावेशक नेतृत्व आहेत ते सर्व समाजाला सर्व घटकाला न्याय देणारे आहेत आणि विकास करणारे आहेत गोरगरिबांच्या अडचनीत ते धाऊन जाणारे आहेत आणि आपल्या सर्वांच्या हक्काचे आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विकास साधला जातो. पाणीपुरवठा योजना,पाणंद रस्ते, वस्ती रस्ते, आरोग्य सेवा, शैक्षणिक सेवा याच माध्यमातून चागंले काम केले जातते. त्यासाठी पट्टीवडगाव गटात एक अभ्यासू व्यक्तिमत्व तथा सेवानिवृत्त मुख्याध्यापक सायस गित्ते यांनी निवडणूक लढवावी अशी सर्व सामान्य नागरिकांतून होत आहे. सर्वसामान्य लोकांच्या मनावर अधिराज्य करणारे आ. धनंजय मुंडे साहेब यांनी सायस गित्ते यांना उमेदवार द्यावी अशी मागणी नागरिक करत आहेत.

**५ सप्टेंबर रोजी दैनिक ...**

पहिल्यांदाच दैनिक समर्थ राजयोग मध्ये समर्थपणे समर्पित होऊन काम करणाऱ्या प्रतिनिधींना आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर उत्कृष्ट प्रतिनिधी २०२५ या सन्मानाच्या पुरस्काराने मान्यवरांच्या शुभहस्ते गौरविण्यात येणार आहे. यावर्षी पहिल्या पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत दैनिक समर्थ राजयोगच्या कार्यकारी संपादिका शेख आयेशा रफिक तसेच अंबाजोगाई येथील उपसंपादक सुनील शिरसाट, बीड येथील उपसंपादक शेख अब्दुल, गेवराईचे तालुका प्रतिनिधी अमोल कापसे, वडवणीचे तालुका प्रतिनिधी शंकर झाडे, आणि जालना जिल्ह्याचे जिल्हा प्रतिनिधी शेख फारूक हे सहा प्रतिनिधी यावर्षी पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत. त्यांना ५ सप्टेंबर रोजी शाल, श्रीफळ, स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते गौरविण्यात येणार असल्याचे संपादक वैभव स्वामी यांनी जाहीर केले आहे. निवड केलेल्या प्रतिनिधींचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

**माहिती व जनसंपर्क ...**

अधिकारी, माहिती कार्यालय, अलिबाग येथून पदोन्नतीवर वरिष्ठ सहायक संचालक (माहिती), (मुख्यालय), मुंबई येथे पदस्थापना देण्यात आली आहे तर बीडच्या विद्यमान माहिती अधिकारी अंजू निमसरकर कांबळे यांची बीड येथून पदोन्नतीवर गोंदिया येथे जिल्हा माहिती अधिकारी म्हणून पदोन्नती मिळाली आहे. उर्वरित पदोन्नती मिळालेल्या अधिकाऱ्यांमध्ये श्री. मंगेश वरकड,जिल्हा माहिती अधिकारी,यवतमाळ यांची जिल्हा माहिती अधिकारी, वर्धा येथे तर श्रीम. शैलजा वाघ दांदळे,जिल्हा माहिती अधिकारी,भंडारा येथेच त्याच पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. श्री. राजेश येसनकर,जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर यांची देखील तेथेच त्याच पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. श्री. ब्रिजकिशोर झंवर, वरिष्ठ सहायक संचालक, मुंबई यांची देखील आहे त्याच ठिकाणी पदोन्नती देण्यात आली आहे.

सरळसेवेच्या कोट्यावरील ४ पदावर माहिती अधिकारी या पदावरून जिल्हा माहिती अधिकारी या पदावर तदर्थ पदोन्नती मध्ये नंदकुमार वाघमारे,माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, ठाणे यांची वरिष्ठ सहायक (माहिती) (प्रकाशने (मुख्यालय) मुंबई येथे पदोन्नती देण्यात आली आहे. श्रीम. वंदना थोरात सहाय्यक संचालक माहिती मुंबई या पदावरून वरिष्ठ सहाय्यक संचालक माहिती मुख्यालय मुंबई येथे पदोन्नती देण्यात आली आहे.श्री. सागरकुमार कांबळे सहाय्यक संचालक माहिती मुंबई यांची पदोन्नतीने वरिष्ठ सहाय्यक संचालक माहिती वृत्तचित्र शाखा मुख्यालय मुंबई येथे पदोन्नतीने बदली झाली आहे.

पान १ वरून...

**मराठवाड्यात ढगफुटी सृदृश्य..**

मोठ्या प्रमाणात सुटल्याने पाणी आलं आहे. बाजूच्या राज्यांसोबत चर्चा सुरु केली आहे. लष्कराला देखील पाचारण केलं आहे. प्रशासन योग्य रितीने सर्व हाताळत आहे. सर्व काही नांदेडमध्ये केलं जात आहे. राज्य सरकार जी मदत असेल ती करेल असे मुख्यमंत्री म्हणाले.

मांजरा धरणातून नदीपात्रात पाण्याचा विसर्ग पुन्हा वाढवला

बीडच्या धनेगाव येथील मांजरा प्रकल्पातून दुपारपासून पाण्याचा विसर्ग वाढवण्यात आला आहे. मांजरा धरण पाणलोट क्षेत्रात पडत असलेल्या पावसामुळं धरणाचे एकूण सहा वक्री दरवाजे उघडण्यात आले आहेत. मांजरा नदीपात्रात १९२१८.५४ क्यूसेक्स इतका पाण्याचा विसर्ग केला जात आहे. कालपासूनच या धरणाचे सहा दरवाजे उघडण्यात आले होते. आज गेट क्रं १,३,४,६ हे १ मीटरने तर गेट २,५ हे ०.७५ मिटरने वर उघडत नदीपात्रात पाण्याचा विसर्ग केला असल्याने.मांजरा नदी काठावरील नागरिकांना खबरदारीचे आव्हान प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

मुंबईच्या पश्चिम उपनगरात मुसळधार पाऊस सुरु

मुंबईच्या पश्चिम उपनगरात मुसळधार पाऊस सुरू आहे. पश्चिम उपनगरात जोरदार पाऊस सुरू असल्यामुळे अंधेरी सबवे पाण्याखाली गेला आहे. अंधेरी सबवे मध्ये तीन ते चार फूट पाणी भरल्यामुळे अंधेरी सबवे वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. सबवे च्या बाहेर पोलिसांनी रस्सी बांधून बंद केली आहे. अंधेरी पूर्व ते पश्चिम ला जाण्यासाठी सध्या पोलिसांकडून गोखले पुलाचा वापर करा असा सूचना केली जात आहे. मात्र पश्चिम उपनगरात जोरदार पाऊस सुरू असल्यामुळे अंधेरी जोगेश्वरी गोरेगाव मालाड विलेपार्ला कांदिवली दहिसर या सर्व भागांमध्ये असलेल्या सखल भागात पाणी भरायला सुरुवात झाला आहे.



अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे कोषाध्यक्ष डॉक्टर मा. श्री. उमेश गांधी यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देतांना डॉक्टर मा. श्री. अशोक गांधी, गांधी महाविद्यालयाचे मा.जीएस श्री. किरण शिनगिरे, श्री. ऋषिकेश भगत, श्री. कार्तिक भोसले दिसत आहेत.

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-२०४ दि.०७.०८.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान गजानन गहेनाजी कदे, रा.कासारवाडी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | धनश्री गजानन कदे | मुलगी | ०३.०१.२०२४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक-०७/०८/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# यशवंतराव चव्हाण स्मृती समिती, अंबाजोगाईचा स्व. भगवानराव लोमटे स्मृती राज्य पुरस्कार २०२५ साहित्यिक डॉ. वासुदेव मुलाटे यांना जाहीर

अंबाजोगाई /प्रतिनिधी

यशवंतराव चव्हाण स्मृती समिती, अंबाजोगाईचा दरवर्षी दिला जाणार स्व. भगवानराव लोमटे स्मृती राज्य पुरस्कार २०२५ संभाजीनगर येथील ज्येष्ठ साहित्यिक डॉ. वासुदेव मुलाटे यांना देण्यात येणार आहे अशी माहिती समितीचे सचिव दगडू लोमटे यांनी दिली आहे. समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. यावेळी समितीचे भगवानराव शिंदे बाप्पा, सतीश लोमटे, प्राचार्य डॉ. प्रकाश प्रयाग, प्राचार्य कमलाकर कांबळे, प्रा. सुधीर वैद्य व प्रा. भगवान शिंदे व आदि सदस्य उपस्थित होते. साहित्य, पत्रकारिता, संगीत, नाट्य, शिक्षण, क्रीडा, सहकार व सुसंस्कृत राजकारणी, आदि क्षेत्रातील राज्यातील एका व्यक्तीस हा पुरस्कार दरवर्षी दिला जातो. यापूर्वी हा पुरस्कार सर्वश्री यशवंतराव गडाख पाटील, पद्मश्री ना. धों. महानोर, विजय कुवळेकर, रामदास फुटाणे, पंडीत नाथराव नेरळकर, विजय कोलते, मधुकर भावे, प्राचार्य रा. रं. बोराडे, उल्हासदादा पवार, पद्मश्री डॉ. यू. म. पठाण, प्रा. भास्कर चंदनशिव व पद्मश्री सतीश आळेकर यांना दिला गेला आहे.

हा यावर्षीचा १३ वा पुरस्कार डॉ. वासुदेव मुलाटे यांना देण्यात येणार आहे. पुरस्काराचे स्वरूप स्मृतिचिन्ह, शाल, सन्मानपत्र, पुष्पहार व रोख पंचवीस हजार रुपये असे आहे. येत्या १९ सप्टेंबर २०२५ शुक्रवार रोजी मान्यवरांच्या हस्ते अंबाजोगाई येथे पुरस्कार वितरण केला जाणार आहे अशीही माहिती लोमटे यांनी दिली.

डॉ. वासुदेव मुलाटे हे एक महत्वाचे लेखक मराठी साहित्याच्या विश्वासात बीड जिल्ह्याने दिले आहेत. अंधारंग, अबॉर्शन आणि इतर कथा, काळोखवेणा, झाड आणि समंध, व्यथाफूल हे कथा संग्रह व मराठवाड्याची कथा, ग्रामीण कथा : स्वरूप आणि विकास हे ग्रंथ आहेत. उलगुलान आणि तडजोड: एक आकलन, ग्रामीण साहित्य चळवळ एक ध्यासपर्व, ग्रामीण साहित्य : स्वरूप व दिशा, ग्रामीण साहित्य : चिंतन आणि चर्चा, चिंतनाच्या क्षितिजावर, झाकोळलेल्या वाटा हे आत्मकथन, दलितांची आत्मकथने : संकल्पना व स्वरूप, नवे साहित्य नवे आकलन, बिंब प्रतिबिंब, मनातलं आभाळ - ललित लेख, विषवृक्षाच्या मुळ्या - कादंबरी, शेतकऱ्यांचा असूड, शोध जाणिवांचा ही समीक्षात्मक, संशोधनात्मक ग्रंथा बरोबरच हार्ट क्रॅकर - विनोदी एकांकिका त्यांनी लिहिली आहे. असा एक महत्वाचा लेखक माजलगावच्या मातीत जन्मला, अमळनेरच्या विद्रोही साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. त्यांनी या संमेलनातील आपल्या भाषणातून वैचारिक उंची देऊन संमेलनाला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. हा अभिमानाचा क्षण सर्वांनी अनुभवला आहे. त्यांनी औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून मराठी विभागात प्राध्यापक म्हणून काम केले आणि तेथूनच त्यांनी निवृत्ती घेतली.जालना येथे २००२ साली झालेल्या १० व्या अण्णाभाऊ साठे राज्य साहित्य संमेलन, २ रे आदिवासी उलगुलानवेध साहित्य संमेलन, चंद्रपूर, १९९४ साली पुण्यात झालेल्या पहिल्या पुणे विभागीय ग्रामीण साहित्य संमेलन, पुणे, शिवार साहित्य संमेलन माजलगाव याचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले आहे. मसापचा रा.श्री. जोग पुरस्कार, दोन वेळा कै. भि. ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार, अंबाजोगाईचा यशवंतराव चव्हाण



स्मृती साहित्य पुरस्कार, महाराष्ट्र राज्य शासनाचे उत्कृष्ट ग्रंथनिर्मितीचे पुरस्कार, स्वातंत्र्य सैनिक मामासाहेब कलगड पुरस्कार आदी पुरस्काराने ते सन्मानित झाले आहेत. स्व. भगवानराव लोमटे व डॉ. मुलाटे यांचा स्नेह जुनाच आहे. ते मूळ माजलगाव येथील असून सध्या संभाजीनगर येथे त्यांचे वास्तव्य आहे. अनेक नवोदित लेखकांची व प्रतिभाशाली लेखकांची त्यांनी पुस्तके प्रकाशित करण्यासाठी प्रोत्साहन दिले आहे. या पुरस्कारासाठी वासुदेव मुलाटे यांच्या राज्यस्तरातून अभिनंदन होत आहे.

# अ.भा.मराठी साहित्य परिषदेच्या आष्टी तालुकाध्यक्षपदी प्रेम पवळ यांची निवड

आष्टी (प्रतिनिधी) तालुक्यातील सुलेमान देवळा गावातील प्रेम पवळ अर्थातच प्रितम सोन्याबापु पवळ हे एका सेवानिवृत्त आरोग्य सेवक कर्मचारी, अत्यंत गरीब कुटुंबातील व्यक्ती आहेत ते दै. पुढारी मराठी वृत्तपत्रचे सुद्धा आष्टी तालुका प्रतिनिधी म्हणून काम पहातात. नुकत्याच झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या कोर कमेटीत प्रेम पवळ यांची आष्टी तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

सामाजिक व साहित्यक्षेत्रातील त्यांच्या भरीव योगदानाची दखल घेऊन परिषदेचे संस्थापक अध्यक्ष शरद गोरे यांनी ही नियुक्ती केली आहे. त्यांचे आजपर्यंत सहा काव्यसंग्रह प्रकाशित असुन त्यांना आठरा राज्यस्तरीय पुरस्काराने देखील सन्मानीत केलेले आहे याचीच दखल घेत दिलेल्या नियुक्तीपत्रानुसार, या पदाचा कार्यकाळ ३१ डिसेंबर २०२८ पर्यंतचा असेल. आता परिषदेचे कार्य समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी त्यांच्यावर असेल.

सुदृढ समाजनिर्मितीसाठी ते अविरत कार्यरत राहतील, अशी अपेक्षा परिषदेकडून व्यक्त करण्यात आली आहे. त्यांच्या कार्याद्वारे सात्विक सुविचारांची पेरणी करून समानतेचा मळा फुलवला जाईल, यावर परिषदेचा विश्वास आहे. त्यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.



# वडवणीत तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा संपन्न

वडवणी (प्रतिनिधी):- वडवणी तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेचे आयोजन दि.२८ ऑगस्ट २०२५ गुरुवार रोजी लोकमान्य टिळक महाविद्यालय येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत बुध्दीबळ, योगासने, फुटबॉल, व्हॉलीबॉल ही खेळ घेण्यात आली. या स्पर्धेत तालुक्यातील १४ वर्षे वयोगट, १७ वर्षे वयोगट, १९ वर्षे वयोगट यातील खेळाडूंनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता. अतिशय उत्साहात ही तालुकास्तरीय स्पर्धा संपन्न झाली.

याप्रसंगी लोकमान्य टिळक महाविद्यालयाचे अध्यक्ष पंजाबराव मस्के हे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. तर प्रमुख पाहूणे म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.जी.कुलकर्णी आणि उपप्राचार्य



गोपीचंद घायतीडक हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बीड व गटशिक्षणाधिकारी कार्यालय वडवणी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन करण्यात आले होते. तालुका क्रीडा अधिकारी रेवननाथ शेलार व गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि गटशिक्षणाधिकारी कार्यालयातील माजेद शेख सर यांच्या नेतृत्वाखाली ही स्पर्धा संपन्न झाली. यावेळी तालुक्यातील १४ वर्षे वयोगट, १७ वर्षे वयोगट, व १९ वर्षे वयोगटातील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. कार्यक्रमाचे अध्यक्ष पंजाबराव मस्के यांनी खेळाडूंना प्रोत्साहन देवून खेळ हा आनंदाने, सहज खेळावा असे सांगितले. प्राचार्य डॉ.बी.जी.कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना बुध्दीबळ खेळासाठी शुभेच्छा दिल्या. क्रीडा संयोजक माजेद सर यांच्या मार्गदर्शनानुसार खेळाचे उत्कृष्ट नियोजन आणि संयोजन करण्यात आले. याप्रसंगी परीक्षक म्हणून क्रीडा शिक्षक भारत बोचरे सर यांनी काम पाहिले. यावेळी महाराणी ताराबाई माध्यमिक विद्यालयाचे क्रीडा शिक्षक निवरकर सर व डॉ.सोनाजीराव रांजवण माध्यमिक विद्यालयाचे क्रीडा शिक्षिका आळणे मॅडम या उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.जी.के.घोडेराव यांनी केले तर शेवटी सर्व उपस्थितांचे आभार मानण्यात आले. या तालुकास्तरीय स्पर्धेतील गुणवंत खेळाडू पुढील जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत. यावेळी त्यांचे अभिनंदन करुन त्यांना पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# राष्ट्रीय एकात्मतेमुळेच देशाचे वेगळेपण - नागोराव कुंभार

## योगेश्वरी शिक्षण संस्था कर्मचारी गणेश व्याख्यानमाला

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

राष्ट्रीय एकात्मता ही काळाची गरज आहे. त्यामुळे वैचारिक मंथन आणि चांगल्या मुल्यांचे संस्कार आपोआपच होतात म्हणून राष्ट्रीय एकात्मता जोपासणे गरजेचे असल्याचे मत जेष्ठ साहित्यिक विचारवंत प्रा.नागोराव कुंभार यांनी व्यक्त केले.

येथील योगेश्वरी शिक्षण संस्था संचालित योगेश्वरी क्रिडा प्रबोधिनी अंतर्गत कर्मचारी गणेश व्याख्यान मालेत ते उद्धाटन सत्रात बोलत होते.अध्यक्षस्थानी यो.शि. संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर होते.उदघाटक म्हणून उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी तर व्यासपीठावर कार्यकारी उपाध्यक्ष ॲड.जगदीश चौसाळकर,सचिव कमलाकर चौसाळकर उपस्थित होते.पुढे बोलताना नागोराव कुंभार म्हणाले की, अलिकडच्या काळात



विवेकशिलता,संयम, शांतता ह्या गोष्टींनी साथ सोडल्याचे लक्षात येते.यासाठी वैचारिक मशागत आवश्यक असून त्यातूनच दिशा, दृष्टी प्राप्त होईल आज च्या युगात राष्ट्रीय एकात्मता अत्यंत महत्वाची असून ती जोपासणे गरजेचे असल्याचेही ते म्हणाले. उद्घाटकीय भाषणात शिवकुमार स्वामी म्हणाले की, स्वातंत्र्य मिळविण्याच्या उद्देशाने लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाची सुरूवात केली त्यातून जनसंघटन झाले आणि स्वातंत्र्य मिळाले पुढील काळात गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजाभिमुख उपक्रम होण्याची गरज आहे.योगेश्वरी शिक्षण संस्थेने व्याख्यानमालेच्या माध्यमातून ज्ञानयज्ञ सुरू केला असून आजही तो कायम चालू आहे ही अत्यंत मोठी गोष्ट आहे.

योगेश्वरी शिक्षण संस्थेने शिक्षणा बरोबरच त्याकाळी सुरू केलेली व्याख्यानमालेची अखंडित परंपरा आजही अव्याहत चालू आहे ही नावलैकिक वाढविणारी बाब असल्याचे संस्था अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर यांनी सांगितले.

प्रारंभी पाहुण्यांचे स्वागत मुख्याध्यापिका ए.आर.पाठक यांनी केले.संचालन सुवर्णा देशमुख,पाहुण्यांचा परिचय तिलोत्तमा इंगोले तर एम.एम.सबनीस यांनी आभार मानले यावेळी संस्था पदाधिकारी, संचालक, प्रतिष्ठित नागरिक, शिक्षक,कर्मचारी उपस्थित होते.

# इतर मागासवर्गातील विद्यार्थ्यांना वसतीगृहासाठी प्रवेश प्रक्रिया सुरु

बीड : इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यासाठी वसतीगृह, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दीनदयाळ उप्याधाय स्वयम योजनेंतर्गत प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रकाबाबत.

शैक्षणिक सन २०२५-२६ करिता इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुला/मुलींसाठी शासकीय वसतीगृहामध्ये प्रवेशासाठी पश्रळपश अर्ज प्रक्रीया सुरु झाली आहे, त्यानुसार इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या मुला-मुलींच्या वसतीगृहामध्ये प्रवेश घेता येणार आहे. तसेच ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडीत दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनेअंतर्गत १२ वी नंतर च्या व्यावसाईक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या विध्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे.

वरीलप्रमाणे शासनाच्या हीींिं:// हारी.ारहरळीं.ास या ऑनलाईन पोर्टलवर १२ वी नंतरच्या व्यावसाईक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी (बिगरव्यावसाईक अभ्यासक्रम वगळून) दि. १ ते १८ सप्टेंबर, २०२५ रोजी पर्यंत अर्ज भरण्यासाठी मुदत दिलेली आहे. तरी जिल्ह्यातील इमाव.विमाप्र. विजाभज विद्यार्थ्यांनी वसतीगृह, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडीत दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनेचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा. अधिक माहितीकरिता इतर मागास बहुजन कल्याण मुला-मुलींचे शासकीय वसतीगृह बीड येथील गृहपाल तसेच सहाय्यक संचालक कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन डी.बी.क्षीरसागर सहाय्यक संचालक इतर मागास बहुजन कल्याण बीड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन

**बीड : महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग अंतर्गत क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अधिनस्त जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, बीड यांच्यावतीने दरवर्षी प्रमाणे या वर्षी ऑलम्पिक वीर मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस हा राष्ट्रीय क्रीडा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.**

महाराष्ट्राचे सुपुत्र ऑलम्पिक वीर कै. खाशाबा जाधव यांचे स्मरण करून फीट इंडिया शपथ घेवून राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त बीड जिल्ह्यातील सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात राष्ट्रीय व आंतरष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झालेले व प्राविण्य प्राप्त केलेल्या खेळाडूंचा राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त दि. २९ ऑगस्ट, २०२५ रोजी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीडमार्फत सन्माननीय व्यक्तींच्या शुभहस्ते सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देवून गौरव करण्यात आला.

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त खालील प्रमाणे विविध क्रीडा उपक्रमाचे आयोजन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड यांच्यामार्फत करण्यात आले आहे. यामध्ये दि. ३० ऑगस्ट, २०२५ रोजी खुल्या वयोगटातील मुलांची ५ कि.मी. तर मुलींची ३ कि.मी. मॅराथॉन दौडचे आयोजन च-हाटा फाटा ते च-हाटा रोड येथे करण्यात आले आहे. तसेच दुपारी १२.०० वा.के.पी.एस. विद्यालय, कालीका नगर, बीड येथे क्रीडा विषयक चर्चासत्राचे आयोजन, दुपारी ४ ते ६ च्या दरम्यान जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे तायक्वाँदो, कराटे, फुटबॉल, स्केटींग या क्रिडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच दि. ३१ ऑगस्ट, २०२५ रोजी रोजी सकाळी ८.०० वा. नागरीक सहभागातून संडे ऑन सायकल या सायकल रॅली चे पालवन चौक ते देवराई, पालवन येथे आयोजन करण्यात आले आहे. तसेच सकाळी ११.०० वा. जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे १७ वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

अधिक माहितीकरिता क्रीडा अधिकारी अनिकेत काळे (९६०४९५९६७८), कालिदास होसूरकर (९४२१५९५५१५), सतिष राठोड (९९२३०१९३५३), अविनाश पाटील (९६२३७८११२१), रेवननाथ शेलार (९०७५४७६७९१) जितेंद्र आराक (९२२६४८१७२८) यांना संपर्क साधवा. तसेच या उपक्रमात जिल्ह्यातील जास्तीत जास्त विद्यार्थी, खेळाडू यांनी सहभाग घ्यावा असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी, बीड अरविंद विद्यागर यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग अंतर्गत क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अधिनस्त जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, बीड यांच्यावतीने दरवर्षी प्रमाणे या वर्षी ऑलम्पिक वीर मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस हा राष्ट्रीय क्रीडा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.

# कराटे स्पर्धेत एशना वावळकर ला गोल्ड मेडल




माजलगाव (प्रतिनिधी)

भारतीय कराटे संघ महाराष्ट्र राज्य चॅम्पयनशिपद्वारा आयोजित वेस्टर्न महाराष्ट्र खानदेश लेव्हल ओपन कराटे चॅम्पियनशिप २०२५-२०२६ नाशिक येथे कराटे चॅम्पियनशिप स्पर्धा संपन्न झाल्या यामध्ये एशना वावळकर हिने उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक मिळून माजलगाव चे नाव उज्वल केले आहे.

कठोर परिश्रम चिकाटी व शिस्त या बळावर एशना ने प्रतिस्पर्धाना पराभूत करत प्रथम क्रमांक पटकावला या यशामुळे एशना वर अभिनंदन चा वर्षाव होत आहे. माजलगाव येथील राजस्थानी विद्यालयात संपूर्ण शिक्षकांनी व शाळेचे मुख्याध्यापक तौर मॅडम यांनी तिचे मनःपूर्वक स्वागत करून कौतुक केले. कराटे या क्रीडा प्रकारात मुलीचा सहभाग वाढावा माजलगाव तील खेळाडूंना प्रेरणा मिळावी यासाठी एशना वावळकर चे यश महत्वपूर्ण ठरत आहे.तिचे सर्वस्तरातुन अभिनंदन करण्यात येत आहे.

# वंचित राहिलेल्या सर्व शेतकऱ्यांना खरीप २०२४ चा पीकविमा वाटप करा

## संभाजी ब्रिगेडची निवेदनातून मागणी

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

वंचित राहिलेल्या सर्व शेतकऱ्यांना खरीप २०२४ चा पीकविमा वाटप करा अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने तालुका कृषी अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.

संभाजी ब्रिगेडच्या वतीने तालुका कृषी अधिकाऱ्यांना नुकतेच देण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, खरीप हंगाम २०२४ चा पीकविमा अद्यापही अंदाजे ७५ टक्के शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आलेला नाही. पीक विमा कंपन्यांकडून शेतकऱ्यांना जाणीवपूर्वक वेठीस धरलं जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रलंबित पीकविमा रक्कमेवरून संभाजी ब्रिगेडच्या वतीने यापूर्वी ही वेळोवेळी प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे. तरी पुढील ८ दिवसांत वंचित राहिलेल्या सर्व अंदाजे ७५ टक्के शेतकऱ्यांना खरीप २०२४ चा पीकविमा तात्काळ वाटप करा अन्यथा या प्रश्नी संभाजी ब्रिगेडच्या वतीने शासन, प्रशासन आणि विमा कंपन्यांच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा सदरील निवेदनाद्वारे देण्यात आला





आहे. या निवेदनाच्या प्रतिलिपी अतिरिक्त जिल्हाधिकारी, आमदार व पीकविमा प्रतिनिधी यांना देण्यात आलेल्या आहेत. सदरील निवेदनावर संभाजी ब्रिगेडचे मराठवाडा विभागीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण ठोंबरे, वंचित बहुजन आघाडीचे मारूती सरवदे, मराठा सेवा संघाचे माजी जिल्हाध्यक्ष रामकिसन मस्के, नारायणराव मुळे, परमेश्वर मिसाळ, ॲड.प्रशांत पवार, अजय मुळे, संतोष मुळे, हेमराज देशमुख, सुदर्शन सरवदे, बाळासाहेब इके, हनुमंत देशमुख, वैजनाथ तोडकर, नागनाथ दिवटे, बळीराम सरवदे, गोविंद उगले, महादेव सरवदे, राघू हरंगुळे, महादेव सरवदे, चंद्रकांत उगले, बाळासाहेब हरंगुळे, बालासाहेब शेळके, व्यंकट चव्हाण आदींसह शेतकरी, संभाजी ब्रिगेड, विविध पक्ष, संघटना यांचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# अंबाजोगाई येथे सुसज्ज असे १ हजार १५० खाटांचे रुग्णालय उभारावे

## स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाचे काम दर्जेदार पद्धतीने करावे- उपमुख्यमंत्री अजित पवार

मुंबई - मराठवाड्यातील ग्रामीण भागासाठी वैद्यकीय शिक्षण व आरोग्यसेवा अधिक सक्षम व्हावी यासाठी बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथे १ हजार १५० खाटांचे सुसज्ज शासकीय रुग्णालय उभारण्यात यावे. तसेच स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाचे काम दर्जेदार पद्धतीने करावे, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या. स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाच्या कामाबाबत उपमुख्यमंत्री श्री.पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आज बैठक झाली. त्यावेळी उपमुख्यमंत्री श्री.पवार बोलत होते.

या बैठकीस वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरज कुमार, संचालक डॉ. अजय चंदनवाले, अधिष्ठाता डॉ.शंकर धपाटे, वित्त विभागाच्या सचिव (वित्तीय सुधारणा) शैला ए.,उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.राजेश देशमुख यांच्यासह संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.देशातील पहिले ग्रामीण



वैद्यकीय महाविद्यालय म्हणून ओळख असलेल्या अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाचे रूपांतर आदर्श शासकीय संस्थेमध्ये करावे असे सांगून उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, अंबाजोगाई येथील वैद्यकीय महाविद्यालयासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. महाविद्यालयाच्या आधीच सुरू असलेल्या व पूर्ण झालेल्या कामांचा समावेश करून नवीन मास्टर प्लॅन तयार करावा. नवीन रुग्णालयात आधुनिक सुविधा, सुपर स्पेशालिटी सेवा यांचा समावेश असावा, उत्कृष्ट सुविधा असाव्यात. मराठवाड्यासाठी हे महाविद्यालय महत्वाचे असून येथे येणाऱ्या रुग्णांची संख्या मोठी आहे. तसेच येथे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल उभारण्याचा प्रस्ताव सादर करावा. काम लवकरात लवकर पूर्ण करावे, सध्या अस्तित्वातील इमारतींचा नियोजनपूर्वक वापर करावा, अशा सूचना उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी दिल्या.

वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी सांगितले की, अंबाजोगाईतील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचा दर्जा उंचावण्यासाठी कार्यवाही वेगाने करावी. चांगला आराखडा तयार करून, कार्यवाही ठोस पद्धतीने व्हावी. मराठवाडा विभागातील लोकसंख्येसाठी ही सुविधा म्हणजे एक मोठा दिलासा ठरणार आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामुळे स्थानिक विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणासाठी नवीन संधी मिळणार असून, ग्रामीण भागातील रुग्णांना तज्ज्ञ सेवांचा लाभ मिळेल.

# नांदेड येथील नृत्य स्पर्धेत नवकेशर डान्स ऍण्ड ड्रामा अकॅडमीच्या ५ विद्यार्थ्यांची लक्षवेधी कामगिरी

## सांस्कृतिक मंत्रालय भारत सरकार व सप्तरंग सेवाभावी संस्था, लय स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस् कडून नृत्य स्पर्धेचे आयोजन

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

येथील नवकेशर डान्स ऍण्ड ड्रामा अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक मंत्रालय भारत सरकार व सप्तरंग सेवाभावी संस्था, लय स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस् , नांदेडकडून आयोजित सप्तरंग फेस्टिव्हल - २०२५ अंतर्गत राष्ट्रीय पातळीवरील नृत्य स्पर्धेत नवकेशरच्या ५ स्पर्धक विद्यार्थ्यांनी स्पृहणीय यश मिळविले आहे. त्यामुळे नवकेशरच्या विजेत्या स्पर्धक विद्यार्थ्यांचे सर्वस्तरांतून कौतुक होत आहे.

याबाबत आमच्या प्रतिनिधीशी बोलताना नवकेशर डान्स ऍण्ड ड्रामा अकॅडमीचे प्रमुख भिमाशंकर शिंदे यांनी सांगितले की, नुकत्याच नांदेड येथे झालेल्या व सांस्कृतिक मंत्रालय भारत सरकार व सप्तरंग सेवाभावी संस्था, लय स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस् , नांदेड यांच्याकडून आयोजित सप्तरंग फेस्टिव्हल - २०२५ अंतर्गत राष्ट्रीय पातळीवरील नृत्य स्पर्धेत नवकेशरच्या ५ स्पर्धक विद्यार्थ्यांनी स्पृहणीय यश मिळविले आहे. या राष्ट्रीय पातळीवरील नृत्य स्पर्धेत विविध वयोगटामध्ये नवकेशर डान्स ऍण्ड ड्रामा अकॅडमीचे पुढील स्पर्धक विद्यार्थी विजेते ठरले. यात ज्युनियर गट प्रथम - श्रावणी साखरे, सबज्युनीयर गट प्रथम - विराज मुंदडा, मायनर गट द्वितीय - आद्या मोमले, मायनर गट तृतीय - आर्यन नांदूरे आणि मायनर गट उत्तेजनार्थ - सोम्या जोगदंड यांचा समावेश आहे. काही दिवसांपूर्वी थायलंड येथील आंतरराष्ट्रीय नृत्य स्पर्धेसाठी 'नवकेशर'चे विद्यार्थी निवडले गेले आहेत. जे स्पर्धक राष्ट्रीय स्पर्धेत विजयी होतात फक्त तेच स्पर्धक विद्यार्थी हे आंतरराष्ट्रीय नृत्य स्पर्धेसाठी पात्र ठरतात. नवकेशर सेवाभावी संस्था अंतर्गत नवकेशर डान्स ऍण्ड ड्रामा अकॅडमी ही मागील तब्बल १७ वर्षांपासून अधिक काळ संस्थेच्या अध्यक्षा सौ.आरती भिमाशंकर शिंदे (लिंबगावकर) यांच्या सातत्यपूर्ण सहकार्य व मार्गदर्शनानुसार अविरत सुरू आहे. आता पर्यंत आपल्या अकॅडमी मध्ये तब्बल २२ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी नृत्याचे प्रशिक्षण घेतले आहे. आज पर्यंत जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नृत्य स्पर्धेत आपल्या विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण कामगिरी करीत सहभाग घेतला आहे. अखिल भारतीय सांस्कृतित संघ, पुणे आयोजित सन २०१४ साली सिंगापूर येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय नृत्य स्पर्धेत आपल्या अकॅडमीचे सहा विद्यार्थी विजेते झाले आहेत. त्यानंतर सन २०१८ साली दुबई येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय नृत्य स्पर्धेत अकॅडमीची विद्यार्थीनी श्रेया बजाज ही सुवर्णपदक विजेती





ठरली व सन २०१९ मध्ये पुन:श्च एकदा सिंगापूर येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय नृत्य स्पर्धेत अकॅडमीच्या ७ विद्यार्थ्यांना गोल्ड, सिल्व्हर व ब्रॉंझ मेडल मिळाले. थायलंड येथील स्पर्धेत यश. मागील १७ वर्षांपासून आपण विद्यार्थ्यांना नृत्य व नाट्य क्षेत्रात विविध प्रकारच्या संधी उपलब्ध करून देत आहोत. आपल्या अकॅडमीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मराठी अल्बम, राज्य नाट्य स्पर्धा, शॉर्ट फिल्म अशा वेगवेगळ्या ठिकाणी संधी मिळवून दिली जाते. आपल्या अकॅडमी मध्ये वय वर्षे ४ पासून पुढील सर्वच वयोगटातील विद्यार्थी नृत्याचे प्रशिक्षण घेत आहेत. नृत्य शिकल्यामुळे चित्रपट क्षेत्रात, नाट्य क्षेत्रात, मराठी अल्बम अशा विविध क्षेत्रांत अनेक संधी आता सहज उपलब्ध होत आहेत. तसे पहायला गेले. तर नृत्य व त्याचे खूप सारे फायदे आहेत, नृत्यामुळे शारीरिक स्वास्थ सांभाळले जाते, मानसिकदृष्ट्या तणावमुक्त जीवन जगता येते. आपल्या अकॅडमी मध्ये बॉलिवूड, लावणी, वेस्टर्न, सेमी क्लासिकल, हिप हॉप, कंटेम्पररी व सर्व महाराष्ट्रीयन लोकनृत्य प्रकार ही शिकविले जातात. नवकेशर अकॅडमी सुरू करण्यामागचा मुख्य उद्देश हाच होता की, जे नृत्य विषयक शिक्षण मला अंबाजोगाईत मिळाले नाही. ते येथील विद्यार्थ्यांना सहजपणे मिळावे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना नृत्य क्षेत्रात आपले करियर करता यावे. अंबाजोगाई ही कलावंतांची खाण म्हणून ओळखली जाते. पण, या कलावंतांना योग्य मार्गदर्शन मिळावे व योग्य संधी उपलब्ध करून देण्यासाठी या अकॅडमीची आमच्याकडून सुरूवात करण्यात आली. आपल्या अकॅडमीचे विद्यार्थी मराठी फिल्म इंडस्ट्री मध्ये ही काम करीत आहेत. ज्यात नंदन नावंदर आणि ऋषिकेश मुंदडा यांचा आवर्जून उल्लेख करता येईल. लवकरच आपण आपल्या अकॅडमीच्या माध्यमातून 'आई योगेश्वरी देवी'ची महिमा सांगणारे मराठी अल्बम व शॉर्ट फिल्मची निर्मिती करणार आहोत. अंबाजोगाई मधील नवकेशर ही पहिली वेस्टर्न डान्स अकॅडमी आहे. अकॅडमी सुरू केली तेव्हा अंबाजोगाईकरांनी आमच्यावर प्रेम व्यक्त करीत, विश्वास ठेवून भरभरून प्रतिसाद दिला. अंबाजोगाई मध्ये कलेची आणि योग्य कलावंतांची कदर करणारा एक मोठा वर्ग आहे. त्यामुळे मला काम करताना खूप लोकांनी मदत केली आहे. ग्रामीण भाग असल्याने अकॅडमीच्या सुरूवातीच्या काळात अनेक अडचणीं ही आल्या पण, योग्य नियोजन, साफ नितिमत्ता, माझी कलेवरील निष्ठा आणि प्रेम या गोष्टींच्या बळावर, सर्वांच्या सदिच्छा व आशिर्वाद यांच्या आधारावर आज अंबाजोगाई मध्ये तब्बल १७ वर्षांचा प्रवास आम्ही यशस्वीरित्या पूर्ण करीत आहोत याचे आनंद व समाधान आहे. पुढील काळात ही नृत्य, सांस्कृतिक, नाट्य या क्षेत्रात अंबाजोगाईकरांच्या ऋणातून उतराई होण्यासाठी ग्रामीण भागातील नवप्रतिभांना नवकेशरच्या माध्यमातून एक दर्जेदार व सशक्त व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा आश्वासक मनोदय नवकेशर डान्स ऍण्ड ड्रामा अकॅडमीचे प्रमुख भिमाशंकर शिंदे

# पिकांची ई पीक पाहणी पुर्ण करण्याचे आवाहन

बीड : हंगाम २०२५-२६ मध्ये केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत दरानुसार राज्यात जिल्ह्यात नाफेड व NCCF च्या वतीने पणन महासंघामार्फत राज्यात कडधान्य व तेलबियांची (मुंग, उडीद, सोयाबीन व तुर) खरेदी करण्यात येणार आहे. आधारभुत दराने खरेदी करण्याकरीता ई-पिक पाहणी असलेला ७/१२ उतारा आवश्यक आहे. तसेच सदर खरेदी प्रक्रिया ही शेतकऱ्यांच्या हितासाठी पारदर्शक, कार्यक्षम व संपूर्णपणे ऑनलाईन प्रणालीद्वारे पार पाडली जाणार आहे. केंद्र शासनाच्या आधारभुत किंमत खरेदी योजनेचा लाभ घेण्याकरीता बीड जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी आपल्या पिकांची ई-पिक पाहणी शासनाने दिलेल्या कालावधीत पुर्ण करावी, असे आवाहन जिल्हा पणन अधिकारी, बीड हरीदास भोसले यांनी केले आहे.



# वस्ती शाळेचा विद्यार्थी नीट पीजी पास.!

बदनापुर-( प्रतिनिधी)वरुडी ता.बदनापूर येथील सुनील बबन काकडे यांनी मेडिकल नीट पीजी परीक्षेत ८०० पैकी ६३१ गुण मिळवून देशात ८१४ वा रँक मिळवत अभूतपूर्व यश संपादन केले आहे त्यांच्या या उज्ज्वल यशाचे शिल्पकार आई वडील यांच्यासह शाल श्रीफळ आणि जिजामातेची प्रतिमा भेट देऊन काकडे वस्ती राहत्या घरी सत्कार केला यशाबद्दल अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी भाजपा चे गणेश कोल्हे यांच्यासह श्रीमान बबन पाटील काकडे,मा.पंचायत समिती सदस्य श्री.भास्कर नाना शिंदे,निराधार समितीचे मा.सदस्य माझे सहकारी श्री बद्री पाटील शिंदे,माझे युवा मित्र वैभव पाटील निंबाळकर,नितीन पाटील ठोंबरे,माऊली पाटील नारळे,अभिषेक पाटील निंबाळकर,मनोहर पाटील बोरुडे,आदी उपस्थित होते.

वस्ती शाळेपासूनचा हा प्रवास ग्रामीण भागातल्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असून आदर्श घेण्यासारखा आहे आपल्या गाव शिवारातील मुलाने यश संपादन करून आई-वडिलासह गाव परिवाराचे नाव मोठे केले भक्कम अभ्यासातून मिळवलेल्या यशाबद्दल सुनील काकडे यांचा खूप अभिमान वाटतो गणेश कोल्हे युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस.

# ३१ ऑगस्ट रोजी 'भटके विमुक्त दिवस' म्हणून साजरा करावा

बीड : इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत शासन निर्णयान्वये ३१ ऑगस्ट हा दिवस राज्यात 'भटके विमुक्त दिवस' म्हणुन साजरा करणे व त्यादिवशी विविध उपक्रम राबविणेबाबत शासनाने निर्देशित केलेले आहे. त्याअनुषंगाने ३१ ऑगस्ट हा 'दिवस भटके विमुक्त दिवस' जिल्हास्तरावर साजरा करण्यात येणार आहे. दि.३१ ऑगस्ट, २०२५ रोजी इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय, बीड यांच्यामार्फत भटक्या विमुक्त संस्कृतीचे जिवनमुल्य, परिसंवाद शासकीय योजनांची माहीती, आरोग्य शिबीर, जात वैधता प्रमाणपत्र वाटप, प्रेरणादायी व्यक्तींचे सत्कार इत्यादी कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत.

यावेळी कार्यक्रमास जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, व इतर प्रशासकीय अधिकारी तसेच प्रमुख पाहुण्यांची उपस्थिती असणार आहे. तरी भटके विमुक्त संघटना यांचे पदाधिकारी, विमुक्त भटके समाजातील बांधवांनी शासकीय विश्राम गृहासमोर, सामाजिक न्याय भवन बीड, येथे दि. ३१ ऑगस्ट, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता कार्यक्रमास बहुसंख्येने उपस्थित रहाण्याचे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण सहायक संचालक डी.बी. क्षीरसागर यांनी प्रसध्दिपत्रकाद्वारे केले आहे.

# राजुर - टेंभुर्णी रोडवरील गाडेगव्हान फाट्याजवळ चारचाकी वाहन विहिरीत कोसळले ; पाच जणांचा मृत्यू

## एक जण गंभीर जखमी.तब्बल सात तासांनंतर मृत्यूदेह बाहेर काढण्यास यश

जाफराबाद/प्रतिनिधी

जाफराबाद तालुक्यातील गाडेगव्हान फाट्याजवळ शुक्रवारी सकाळी सहा वाजेच्या दरम्यान भरधाव कारने मॉर्निंग वॉक करणार्यांना वाचवण्याच्या प्रयत्नात एक जणाला धडक देऊन गंभीर जखमी करून कार रोड लगत असलेल्या ७० फुट विहिरीत जाऊन आदळली यामध्ये पाच जणांचा पाण्यात बुडुन मृत्यू झाला.ज्ञानेश्वर लक्ष्मण भांबिरे वय ५५ राहणार कोपर्डा तालुका भोकरदन निर्मला सोपान डकले वय २५ राहणार गेवराई गुंगी तालुका फुलंब्री ,ज्ञानेश्वर भाऊसाहेब डकले वय ४० राहणार गेवराई गुंगी तालुका फुलंब्री, पद्माबाई लक्ष्मण भांबिरे वय ५५ राहणार कोपर्डा , अजीनाथ तुळशीराम भांबीरे वय ४० अशी मयताची नावे आहेत. तर गंभीर जखमी मध्ये भगवानराव साळुबा बनकर वय ५२ रा. गाडेगव्हान यांच्यावर जालना येथील कलावती हॉस्पिटल मध्ये उपचार सुरू आहे.याबाबत अपघाताची माहिती अशी की, गेवराई (गुंगी)येथील मयत ज्ञानेश्वर डकले हे भोकरदन तालुक्यातील कोपर्डा या गावातील पद्माबाई लक्ष्मण भांबीरे या नातेवाईकांना अर्धांग वायूच्या उपचारासाठी सुलतानपूर येथे घेवून जात



असतांना राजुर- टेंभुर्णी रोडवरील गाडेगव्हान फाट्याजवळ मॉर्निंग वॉक करणाऱ्या युवकांना वाचवण्याच्या प्रयत्नात एकाला जोराची धडक देऊन भरधाव कार रोड लगत असलेल्या ५० फुट अंतरावर असलेल्या विहिरीत जाऊन कोसळली.ही घटना सकाळी शुक्रवारी सहा वाजेच्या दरम्यान घडली. या घटनेमुळे संपूर्ण तालुका हादरा असुन या घटनेची माहिति टेंभुर्णी पोलिस ठाण्याचे एपीआय कैलास भारती, सपोनी बाबासाहेब खार्डे, हसनाबाद पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संजय आहीरे यांच्यासह कर्मचार्यांनी घटनास्थळी धाव घेऊन तात्काळ मदत कार्य सुरू केले. घटना स्थळी जालना येथील अग्नीशमन दल, रेस्क्यू टीम , महसूल यंत्रणा यांनी बचाव कार्य सुरू केले होते. पण विहिरीत ६० फूट पाणी असल्याने अडथळा निर्माण झाला होता. अखेर सात तासाच्या प्रयत्नानंतर मृत्यू देह विहिरीतून बाहेर काढण्यात यश आले. अपघातग्रस्ताना मदत करण्यासाठी देळेगव्हाण, गाडेगव्हाण येथील नागरिकांनी बचाव कार्यास मदत केली होती. या घटनेची माहिती मिळताच जालना पोलीस उपअधीक्षक आयुष नोपानी, भोकरदन येथील उपविभागीय पोलीस अधिकारी, डॉक्टर नितीन कटेकर, नायब तहसीलदार मंगेश साबळे व महसूल चे कर्मचारी, अग्निशामन दलाचे जालना येथील पान पाटील, वाहन निरीक्षक भिमाजी नागरे,राजाभाऊ देशमुख,शालिकराममहस्के ,उद्धव दुनगहु,अजय बनकर,गोविंदराव पंडित, दत्तू पंडित, हे घटनास्थळी मदत कार्य करीत होते.या घटनेने संपूर्ण तालुका हादरला आहे.या अपघातात मृत्यूदेहाची तपासून शवविच्छेदन करुन मृत्युदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. माहिती मिळताच आमदार संतोष पाटील दानवे यांची घटनास्थळी धाव....

राजुर-टेंभुर्णी रस्त्यावर गाडेगव्हान फाट्यावर चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने गाडी विहिरीत कोसळून त्यामध्ये असलेल्या पाच जणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडल्याची माहिती आमदार संतोष पाटील दानवे यांना समजताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. यावेळी घटनास्थळी घडलेल्या सर्व प्रकाराची माहिती घेत



# कन्या हायस्कूल बदनापूरच्या मुलींची जिल्हा स्तरावर निवड

बदनापूर (प्रतिनिधी)आज झालेल्या तालुकास्तरीय कॅरम स्पर्धेमध्ये १४ १७ १९ वर्षे वयोगटांमध्ये एकूण १६ मुली पैकी १३ मुलींची जिल्हास्तरावर निवड

यामध्ये सिद्धी जारे, रूपाली सावंत, पुनम खिल्लारे ,साक्षी चाळगे, अश्विनी भवरे, पल्लवी राठोड ,लक्ष्मी पेंढारकर, आलिया पठाण, ज्योति चाळगे ,भारती साबळे ,

कीर्ति नागवे, ईश्वरी अंभोरे, गायत्री निंबाळकर सर्व विजयी खेळाडूंचे संस्थापक अध्यक्ष ड. अनंतराव शेडगे साहेब सचिव श्रीमती प्रतिभा शेडगे मॅडम कार्यकारी संचालक ड. रणजीत शेडगे साहेब, मुख्याध्यापिका श्रीमती दिपाली टिके मॅडम क्रीडा शिक्षक श्री नागलोत सर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यातर्फे सर्व विजयी खेळाडूंची अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छ दिल्या

# प्रियदर्शनी क्रीडा, सांस्कृतिक व व्यायाम मंडळाच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त भव्य ढोल ताशा पथक स्पर्धेचे आयोजन

## शहरातील जास्तीत जास्त गणेश मंडळांच्या ढोल ताशा पथकांनी स्पर्धेत सहभागी व्हावे - संकेत राजकिशोर मोदी

अंबाजोगाई (प्रतिनिधी):- अंबाजोगाई शहरातील प्रियदर्शनी क्रीडा, सांस्कृतिक व व्यायाम मंडळाच्या वतीने गणेशोत्सवा निमित्ताने ढोलताशा पथकांच्या भव्य अशा खुल्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहेत .या ढोलताशा पथक स्पर्धेमध्ये शहरातील जास्तीत जास्त ढोलपथक संघांनी सहभागी व्हावे असे आवाहन संयोजक संकेत राजकिशोर मोदी यांनी केले आहे. ही स्पर्धा बुधवार दि ३ सप्टेंबर २०२५ रोजी शंकर महाराज वंजारी वसतिगृहाच्या मैदानात दुपारी एक वाजता संपन्न होतील असेही संकेत मोदी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे जाहीर केले आहे. स्पर्धेतील यशस्वी संघांना भरघोस रोख रक्कम तसेच सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित देखील करण्यात येणार आहे. या स्पर्धेचे यंदाचे हे तिसरे वर्ष आहे.

संकेत मोदी हे अंबाजोगाई शहर व मोदी कुटुंबाची सांस्कृतिक व शैक्षणिक परंपरा मोठ्या जोमाने व उत्साहाने पुढे नेत आहेत. अंबाजोगाई शहरात ते अनेक वेळा वेगवेगळे शैक्षणिक तसेच सांस्कृतिक उपक्रम राबवून शहरातील विद्यार्थी, कलावंत आदींना एक व्यासपीठ उपलब्ध करून देत आहेत. त्यामुळे ते शहरातील तरुणाईच्या मनामनात आपले स्थान निर्माण करण्यात यशस्वी होत आहेत. त्याचबरोबर राजकिशोर मोदी यांच्या माध्यमातून प्रियदर्शनी क्रीडा मंडळ हे मागील ३५ वर्षांपासून शहरात विविध क्रीडा, सांस्कृतिक , शैक्षणिक कार्यक्रम आयोजित करत आहे. अंबाजोगाई शहरात १०० च्या जवळपास गणेश मंडळ कार्यरत आहेत. यावर्षी सलग तिसऱ्यांदा या गणेश मंडळासाठी संकेत मोदी यांच्या संकल्पनेतून शहरातील गणेशोत्सवानिमित्त ढोल ताशा पथकांच्या भव्य अशा खुल्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत प्रथम क्रमांक रुपये ३१००१/-, द्वितीय क्रमांक रुपये २१००१/- , तृतीय क्रमांक रुपये १५००१/-, चतुर्थ क्रमांक रुपये ७००१/- तर उत्तेजनार्थ रुपये ५००१/- अशा बक्षिसांची लयलूट प्रियदर्शनी क्रीडा मंडळाच्या वतीने करण्यात आली आहे. तेव्हा या स्पर्धेत शहरातील जास्तीत जास्त गणेश मंडळाच्या ढोल ताशा पथकांनी आपला सहभाग नोंदवावा असे अवाहन संकेत मोदी यांच्या वतीने करण्यात येत आहे. प्रियदर्शनी क्रिडा व सांस्कृतिक मंडळाच्या वतीने मागील ३५ वर्षांपासून अंबाजोगाई तालुक्यातील शालेय विद्यार्थ्यांसाठी बाल झुंबडचे आयोजन देखील करण्यात येत आहे तसेच स्वा रा ती रुग्णालयातील रुग्णांसाठी भव्य असे रक्तदान शिबीर, त्याचबरोबर दीपावली निमित्त रुग्णांना फराळ वाटपाचा कार्यक्रमही आयोजित करण्यात येऊन रुग्णांच्या चेहऱ्यावर हसू फुलवण्याचे काम राजकिशोर मोदी तथा संकेत मोदी यांच्या माध्यमातून करण्यात येत असते.




गणेशोत्सवा निमित्ताने आयोजित खुल्या ढोल ताशा वाद्य स्पर्धेत सहभागी होण्यासाठी सचिन जाधव ९९७५१७१९४४ , दत्ता सरवदे ९८९००४१००६, महेश कदम ९९७०१०५८५९, रोहन कुरे ,९०२८९९१०००, शुभम लखेरा ८६००६३४६००, सुशील जोशी ९८९०९ ४७८४७, शरद काळे ७६६६९३३७१७, अस्लम शेख ९६६५७४८४७५ यांच्याशी दि २ सप्टेंबर २०२५ दुपारी २ वाजेपर्यंत संपर्क साधावा असे आवाहन संकेत राजकिशोर मोदी यांच्या वतीने करण्यात येत आहे. नियम , अटी व अंतिम निकाल हा मंडळाच्या परिक्षकाकडेच राहील व तो अंतिम व अबाधित राहील.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# दामिनी पथकाची जिल्ह्यातील विविध शाळा व कॉलेजला भेटी

## विद्यार्थ्यांना कायदेविषयक जनजागृतीपर मार्गदर्शन

बीड /प्रतिनिधी

दामिनी पथक प्रमुख झडख पल्लवी जाधव यांनी दिनांक २५/०८/२०२५ ला स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय आंबेजोगाई येथे भेट दिली. तसेच,काल दिनांक २८/०८/२०२५ रोजी गोरक्षनाथ विद्यालय व कनिष्ठ महविद्यालय ढेकणमोहा ता. जि. बीड येथे भेट देवून, येथील मुलीसह विद्यार्थ्यांना बालकांचे अधिकार, बाल लैंगिक अत्याचार अधिनियम, गुडटच-बॅडटच, बालविवाह प्रतिबंध कायदा, महिलांना भारतीय संविधानाने दिलेले मुलभूत अधिकार या कायद्याबाबत मार्गदर्शन केले.



तसेच धुम्रपान करू नये, मोबाईलचा अतिवापर टाळावा, अशा अनेक विषयावर मार्गदर्शन केले, तसेच मुलींनी दैनंदिन वापराच्या वस्तूने आत्मसंरक्षण कसे करायचे याबाबत माहिती देण्यात आली. यावेळी ५०० ते ६०० विद्यार्थी हजर होते. त्यांना तत्काळ मदती साठी टोल फ्री हेल्पलाईन ११२, १०९१, १०९८ वर कॉल करणे तसेच ऑफिस कडून तयार करण्यात आलेला ठठ कोड वर तक्रार करणेबाबत सांगितले.

त्याचप्रमाणे दामिनी पथक हे शहरात तसेच तालुक्याच्या ठिकाणी जावून बस स्टँड, शाळा, कॉलेजच्या समोर, क्लासेस अशा वर्दळीच्या ठिकाणी गस्त करुन, मागच्या दोन महिन्यात १०० च्या वर रोडरोमियोवर मुंबई पोलीस अधिनयम अन्वये ११०/११७ नुसार प्रतिबंध कारवाई करण्यात आल्या आहेत.

# 'आठवडी बाजार'च्या दिवशीच 'व्यथांचा बाजार': उपजिल्हा रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या संपामुळे रुग्णसेवा ठप्प

अंबड (प्रतिनिधी): अंबड येथील उपजिल्हा रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या अनिश्चितकालीन संपामुळे आरोग्य सेवेची दुरवस्था झाली असून, याचा सर्वाधिक फटका गरीब आणि गरजू रुग्णांना बसत आहे. विशेषतः आठवडी बाजाराच्या दिवशी, गुरुवारी (दि. २८), उपचारासाठी आलेल्या शेकडो रुग्णांना योग्य उपचार न मिळाल्याने तासनतास प्रतीक्षा करावी लागली.



राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी नियमित सेवेत सामावून घेण्याच्या मागणीसाठी बेमुदत संप पुकारला आहे. त्यांच्या या आंदोलनामुळे रुग्णालयातील कामकाज पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. गुरुवारी नेहमीच रुग्णांची मोठी गर्दी असते, पण संपामुळे परिस्थिती आणखीच बिकट झाली. ओपीडी वॉर्ड क्र. १७ मध्ये केवळ दोनच डॉक्टर उपस्थित असल्याने रुग्णांची तपासणी करणे कठीण झाले होते.

डॉक्टरांच्या तत्परतेमुळे रुग्णांना दिलासा


या गंभीर परिस्थितीची माहिती 'दैनिक समर्थ राजयोग' वृत्तपत्राचे पत्रकार फारुख शेख यांनी वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुरमवाड यांना दिली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन, डॉ. सुरमवाड यांनी तात्काळ संपावर असलेल्या डॉक्टरांशी संपर्क साधला आणि ग्रामीण भागातील रुग्णांची होणारी गैरसोय थांबवण्यासाठी कामावर परत येण्याची विनंती केली. त्यांच्या विनंतीला मान देऊन काही डॉक्टरांनी काम सुरू केले, ज्यामुळे ओपीडीवरील ताण कमी झाला आणि रुग्णांना काहीसा दिलासा मिळाला.

प्रशासकीय अनास्थेवर प्रश्नचिन्ह

कर्मचाऱ्यांच्या मागण्या रास्त असल्या तरी, त्यांच्या संपामुळे सामान्य जनतेला त्रास होत आहे. प्रशासनाच्या धोरणात्मक निर्णयाची प्रतीक्षा असताना, याचा थेट परिणाम आरोग्य सेवेवर दिसून येत आहे. शासनाने या कर्मचाऱ्यांच्या मागण्यांकडे त्वरित लक्ष देऊन यावर कायमस्वरूपी तोडगा काढणे आवश्यक आहे, जेणेकरून भविष्यात अशा घटना पुन्हा घडणार नाहीत आणि गरीब रुग्णांना वेळेवर उपचार मिळू शकतील. आरोग्य सेवा हा प्रत्येक नागरिकाचा हक्क आहे आणि तो कोणत्याही परिस्थितीत हिरावून घेतला जाऊ नये.

# ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी घेतला आढावा

बीड : महाराष्ट्र ठेविदारांच्या (वित्तीय संस्थामधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ (एमपीआयडी ॲक्ट १९९९) अन्वये ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत श्री. जॉन्सन यांनी ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यासंदर्भात संबंधीत विभागानी केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर आढावा घेतला.





यावेळी बैठकीस पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक एस.एस.शेजाळ, गुन्हे अन्वेषण विभाग (उखऊ) छत्रपती संभाजीनगरचे पोलीस अधिक्षक यशवंत काळे, सहजिल्हा निबंधक वर्ग-२ बीडचे एस.एम.शेख, विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, लातूर विभागचे फडणवीस सर, सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी बीड / माजलगावचे गौरव इंगोले, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीडचे सतीश तोतावार, जिल्हा सरकारी वकील धनंजय वाकनकर, अवसायक सर्व वित्तीय संस्थाचे आर.एम.तोटे, श्री. साई अर्बन मल्टीस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.बीडचे व्यवस्थापक सचिन घोडके, ज्ञानराधा मल्टी स्टेट को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. बीडचे संपर्क अधिकारी गोपाळकृष्ण परदेशी, मॉ जिजाऊ मल्टीस्टेट को-ऑप सोसायटी, बीडचे व्यवस्थापक सुरज जगदाळे यांची उपस्थिती होती.

यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी एमपीआयडी संदर्भातील कामकाज गतीने होण्यासंदर्भात मा. जिल्हा मुख्य न्यायाधीश यांना पत्र देवुन सर्व कोर्टांची बैठक घेण्याबाबत विनंती करण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच ज्या प्रकरणामध्ये अधिसूचना प्रसिध्द झालेल्या नाहीत, त्या संदर्भात अपर मुख्य सचिव (गृह) यांना पत्र देवून अधिसूचना प्रसिध्द करुन सक्षम प्राधिकारी नेमणेबाबत विनंती करण्यात येणार आहे. सर्व अवसायक यांना त्यांची कार्यपध्दती निश्चित करणेबाबत सूचित करण्यात आले आहे. तसेच नोंदणी महानिरीक्षक आणि मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य यांना पत्र देवून मालमत्तांच्या मुल्यांकना संदर्भातील माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी एक नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यासाठी विनंती करण्यात आल्याचे सांगितले. तसेच या विषयावर पुढील बैठक एक महिन्यानंतर घेण्यात येणार असल्याचे ही यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सांगितले.

# जादूगाराच्या जयंतीला, क्रीडाप्रेमाचा जागर!

जालना /प्रतिनिधी

मेजर ध्यानचंद, भारतीय हॉकीचे जादूगार, यांची जयंती 'राष्ट्रीय क्रीडा दिन' म्हणून मोठ्या उत्साहात साजरी झाली. जालना येथील अंकुशराव टोपे महाविद्यालयात आयोजित एका खास कार्यक्रमात, हॉकीच्या या महान खेळाडूच्या योगदानाला आदराने अभिवादन करण्यात आले.



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस यांनी ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. यावेळी त्यांनी खेळाचे जीवनातील महत्त्व सांगितले आणि विद्यार्थ्यांना खेळातून शिस्त व चिकाटीचे महत्त्व आत्मसात करण्याचा सल्ला दिला.

क्रीडा संचालक डॉ. भुजंगराव डावकर यांनी ध्यानचंद यांच्या अविश्वसनीय कारकिर्दीचा वेध घेतला. त्यांनी सांगितले, खेळ केवळ मनोरंजन नाही, तर ते एक उत्तम करिअरची संधी आहे. विद्यार्थ्यांनी फक्त अभ्यासच नाही, तर खेळातही उत्कृष्ट कामगिरी करून देशाचे नाव उज्वल करावे. डॉ. डावकर यांनी खेळाडूवृत्तीचे महत्त्व समजावून सांगितले.

यावेळी उपप्राचार्य डॉ. संजय पाटील, उपप्राचार्य प्रा. पांडुरंग खोजे, आणि इतर प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी खेळाच्या प्रतिज्ञा घेऊन 'खेलो इंडिया'ला अधिक महत्त्व देण्याचे आवाहन केले.

हा दिवस फक्त मेजर ध्यानचंद यांना आदरांजली वाहण्यासाठी नव्हता, तर विद्यार्थ्यांमध्ये खेळभावना आणि आरोग्याबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी होता. या दिवसाने विद्यार्थ्यांना खेळातून मिळणारे शारीरिक आणि मानसिक फायदे समजावून सांगितले.

# दाधिच समाजात ऋषी पौर्णिमा निमित्त रक्षाबंधन उत्साहात साजरा

गेवराई (प्रतिनिधी)

गेवराई शहरातील राम मंदिर गल्ली येथील श्री. राम मंदिराच्या सभागृहात दायमा कुटुंबाच्या वतीने ऋषी पंचमी निमित्त रक्षाबंधनाचा कार्यक्रम दि. २८ ऑगस्ट रोजी सायंकाळी सात वाजता आयोजित करण्यात आला होता.दाधिच समाजात रक्षाबंधनचा सण हा 'ऋषी पंचमी' या दिवशी साजरा केला जातो, कारण या दिवशी त्यांना ऋषी-मुनींच्या आशीर्वादाने वंश मिळाला असे मानले जाते. या दिवशी, बहिणी भावांच्या मनगटावर राखी बांधतात, तर भाऊ बहिणींना भेटवस्तू देतात आणि त्यांचे संरक्षण करण्याचे वचन देतात. या परंपरेमुळे कौटुंबिक संबंध अधिक घट्ट होतात.दाधिच समाजात ऋषी पौर्णिमा आणि रक्षाबंधन एकत्र साजरे केले जाते. या दिवशी दाधिच समाजातील बहिणी आपल्या भावांच्या मनगटावर राखी बांधून त्यांच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करतात आणि भाऊ बहिणीच्या संरक्षणाचे वचन देतो. हा सण प्रेम व कर्तव्य यांचे प्रतीक असून कौटुंबिक संबंधांचे भाऊ बहिणीला संरक्षणाचे वचन देतात. दाधिच समाजात ऋषी पौर्णिमेला रक्षाबंधन साजरी केली जाते. या दिवशी दाधिच समाजातील भगिनी आपल्या भावांच्या मनगटावर राखी बांधतात आणि त्यांच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करतात. हा सण भाऊ-बहिणीच्या पवित्र नात्याचे आणि माहात्म्याचे प्रतीक आहे. या निमित्ताने समाजात विविध कार्यक्रम आयोजित केले जातात, कौटुंबिक एकत्र येणे आणि सामूहिक भोजनाचा आस्वाद घेत कुटुंबात आनंद साजरा केला जातो.



# पहाडी पारगाव येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती भर पावसात मोठ्या उत्साहात साजरी

## महाराष्ट्र आधार सेनाचे संस्थापक अध्यक्ष दिपक थोरात यांची उपस्थिती

वडवणी। प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील पहाडी पारगाव येथे, दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंतीनिमित्त दि.२८ ऑगस्ट २०२५ गुरुवार रोजी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



महाराष्ट्र आधार सेनेचे संस्थापक अध्यक्ष तथा सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ चे संपादक मा.दिपकभाऊ थोरात यांच्या शुभहस्ते साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन पूजन करून जयंती साजरी करण्यात आली.

याप्रसंगी महाराष्ट्र आधार सेना चे कार्याध्यक्ष उद्धव आरे, धारूर तालुकाध्यक्ष अर्जुन पाटोळे,वडवणी तालुकाध्यक्ष सतीश हनवते,करण सरवदे,महाराष्ट्र आधार सेना वडवणी शहराध्यक्ष तथा कृष्णा मोबाईल शॉपी वडवणीचे मिलिंद पाटोळे तसेच डीपीआय धारूर तालुकाध्यक्ष पप्पू पाटोळे, सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष विशाल पाटोळे,उपाध्यक्ष युवराज पाटोळे,सचिव लखन पाटोळे,सहसचिव योगेश पाटोळे,मिलिंद पाटोळे,अर्जुन पाटोळे यांच्यासह सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे सर्व पदाधिकारी मान्यवर म्हणून उपस्थित होते.

महाराष्ट्र आधार सेनाचे संस्थापक,अध्यक्ष दिपकभाऊ थोरात यांनी भर पावसात अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त सर्वांना संबोधित करून जयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने गावातील पुरुष,महिला,तरुण मंडळी उपस्थित होते.

# महाराष्ट्र कारागृह विभाग ध्वज दिन

**महाराष्ट्र कारागृह विभागाला दिनांक ०१ सप्टेंबर १९६९ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री दिवंगत वसंतरावजी नाईक यांच्या हस्ते प्रथमच नवा ध्वज अर्पण करण्यात आला होता. त्यावेळी मुख्यमंत्री नाईक भाषणातून आपले विचार मांडत हा ध्वज ऐक्याचे, श्रध्देचे कर्तव्याचे आणि अभिमानाचे प्रतिक असून त्याची या विभागामार्फत् मान राखला जाईल असा मला विश्वास वाटतो असल्याचे म्हणाले होते.**

**ध्वज हे शिस्त जबाबदारी एकता व मानाचे चिन्ह मानले जाते. कारागृह विभागाचा ध्वज त्याचेच प्रतीक आहे. या ध्वजाबरोबर कारागृह विभागाच्या जबाबदाऱ्या कशा वाढल्या आहेत. राज्यातील तुरुंगात सुरक्षा, शिस्त आणि शांतता राखणे ही या विभागाची मुलभूत जबाबदारी आहे. याशिवाय बंदीजनांना सन्मार्गावर आणण्याचा प्रयत्न करणे ही कारागृह विभागाची जबाबदारी आहे. .**



या समारंभास तत्कालीन महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री मधुकरराव चौधरी, गृहखात्याचे उपमंत्री कल्याणराव पाटील त्याचप्रमाणे प्रमुख निमंत्रीत नागरीक उपस्थित होते. ध्वज अर्पण समारंभा प्रसंगी कारागृह विभागाचे तत्कालीन महानिरीक्षक दौलतराव जाधव यांनी पाहुण्यांचे स्वागत केले होते. तुरुंगाधिकारी आणि रक्षक दलाचे परेड संचालन, तुरुंग अधिकारी एस. आर. चव्हाण यांनी केले.

महात्मा गांधी यांच्या अर्धपुतळ्याचे अनावरण

दि.०१ सप्टेंबर १९६९ रोजी मा. दिवंगत मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक यांनी येरवडा मध्यवर्ती कारागृहाला महात्माजी या कारागृहात असताना जेथे कारावासात होते. त्या यार्डास भेट देवून आदरांजली वाहिली. त्या खोलीच्याच पुढील आवारात सुमारे पाचशे रुपये खर्चुन उभारण्यात आलेल्या महात्मा गांधीजीच्या अर्धपुतळयाचे अनावरण मुख्यमंत्री नाईक यांच्या हस्ते झाले. हा पुतळा श्री. बाबुराव महाडीक इनस्ट्रक्टर येरवडा मध्यवर्ती कारागृह यांनी आनंदा ज्ञानु शिंदे, बंडा गुंडाप्पा सुतार आणि ईश्वरी केरु कुंभार या बंदीजनाच्या सहाय्याने तयार केला आहे. महात्माजींच्या अर्धपुतळयाचे अनावरण चालू असताना कारागृहातील काही महिला बंदी सुरेल. आवाजात भजने म्हणत होत्या.

हुतात्मा स्मारक अनावरण-


सोलापूर नगरपालिकेने इ.स. १९६१ रोजी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्र्याना पत्राव्दारे विनंती केली की, येरवडा कारागृहात सोलापूरच्या श्री. मल्लाप्पा धनशेट्टी व इतर चार सुपुत्राना फाशी देण्यात आली. त्यांचे यथोचित स्मारक उभारण्यात यावे. या विनंतीनुसार महाराष्ट्र शासनाने येरवडा मध्यवर्ती कारागृहात ज्यांनी स्वातंत्र्य संग्रामांत कारावास भोगला व आत्मार्पण केले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ येरवडा मध्यवर्ती कारागृहाचे परिसरात स्मारक उभारण्याचे ठरविले. त्यानुसार तुरुंग विभागातर्फे सुमारे १५००/- रुपये खर्चुन हे स्मारक उभारण्यात आले. त्याचे अनावरण दि.०१ सप्टेंबर १९६९ रोजी मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक यांच्या हस्ते तुरुंग अधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय, येरवडा पुणे-०१ येथे करण्यात आले.भारतीय स्वातंत्र्य संग्रामात येरवडा मध्यवर्ती कारागृहात ज्यांनी बंदिवास भोगून आत्मार्पण केले.

# समर्थ राजयोगचा विवेकाचार्य पुरस्कार ज्येष्ठ शिक्षकनेते उत्तम पवार यांना जाहीर !

## शिक्षक दिनी ५ सप्टेंबर रोजी होणार पुरस्काराचे वितरण

बीड /प्रतिनिधी

समर्थ राजयोगचा विवेकाचार्य हा सन्मानाचा पुरस्कार यावर्षी ज्येष्ठ शिक्षक नेते तथा सेवानिवृत्त केंद्र प्रमुख उत्तम पवार सर यांना जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्काराचे शानदार वितरण शुक्रवार दिनांक ५ सप्टेंबर २०२५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन, नगर रोड बीड येथे होणार असल्याची माहिती संपादक वैभव स्वामी यांनी जाहीर केली आहे.



दैनिक समर्थ राजयोगच्या वर्धापन दिनानिमित्त शिक्षक दिनाचे औचित्य साधून जगद्विवेक प्रतिष्ठान याच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दिनांक ५ सप्टेंबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बीड येथे सकाळी ११ वाजता विवेकाचार्य या सन्माननीय पुरस्काराचे वितरण मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात येणार आहे. यावर्षी विवेकाचार्य या पुरस्काराचे मानकरी सेवानिवृत्त केंद्रप्रमुख ज्येष्ठ शिक्षक नेते उत्तम पवार सर यांना प्रदान करण्यात येणार आहे, असे संपादक वैभव स्वामी यांनी जाहीर केले आहे. सेवागौरव प्रित्यर्थ सेवानिवृत्त केंद्र प्रमुख तथा ज्येष्ठ शिक्षक नेते उत्तम पवार सर यांना विवेकाचार्य हा सन्मानाचा पुरस्कार जाहीर झाल्याने त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# सुभाष धोंडे यांचे प्रशासकीय काम अत्यंत प्रामाणिक - मा.आ.साहेबराव दरेकर

## धोंडे हे नशिबवान आहेत,कारण माता व गुरु यांची कार्यक्रमाला उपस्थिती - देविदास धस

आष्टी - (प्रतिनिधी) नियत वयोमानानुसार वयाची ५८ वर्ष पुर्ण झाल्यामुळे पंचायत समिती आष्टी, ता. आष्टी, जि. बीड येथील जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग आष्टी चे कनिष्ठ सहाय्यक सुभाष गंगाधर धोंडे हे दि. ३१ ऑगस्ट २०२५ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. या निमित्त सुभाष गंगाधर धोंडे यांचा सेवापुर्ती गौरव सोहळा शुक्रवार दिनांक २९ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ वा. मोरेश्वर मंगल कार्यालय, आष्टी, जि. बीड येथे मोठ्या थाटात संपन्न झाला.

तरी या सेवापुर्ती सोहळ्यास अध्यक्ष म्हणून गोकुळ बागलाने (प्रशासक तथा गटविकास अधिकारी पं. स. आष्टी) हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून मा. आ. साहेबराव दरेकर, मा. जि. प. सदस्य देविदास आबा धस, समाजसेवक तथा भाजपा महाराष्ट्र परिषद सदस्य विजयकुमार गोल्हार, राजेंद्र काका धोंडे, ह. भ. प. झांबरे महाराज, आदर्श शिक्षक जनार्धन कासले सर, नायब तहसिलदार भगिरथ धारक, मा. नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, चेअरमन नामदेव भाऊ राऊत, सरपंच अशोक मुळे, मनसे जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर, प्राचार्य कोल्हे, फोटोग्राफर संघटनेचे तालुकाध्यक्ष सचिन रानडे, विधिज्ञ वामनराव निकाळजे, मा. सभापती अरुण भैय्या निकाळजे, जेष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, गोरे साहेब, प्रल्हाद तळेकर, जायभाय साहेब, महाजन साहेब, निंबाळकर साहेब, सुनिल वाघ, पत्रकार अक्षय विधाते, आण्णासाहेब साबळे, राजेंद्र लाड आदी उपस्थित होते.

सुरुवातीला महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन व्यासपीठावरील मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. तद्नंतर अध्यक्ष व प्रमुख अतिथींचा सत्कार संयोजक मधुकर निंबाळकर व उपअभियंता जि. प. बांधकाम उपविभाग आष्टी येथील कर्मचारी व सुभाष धोंडे यांचे नातेवाईक यांनी गुलाबपुष्प, शाल व पुस्तक देवून केला. यानंतर अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या शुभहस्ते सुभाष धोंडे यांचा सपत्नीक उभा पोषाख देवून सत्कार करण्यात आला. यावेळी सुभाष धोंडे यांच्या आदर्श मातोश्री श्रीम. तुळसाबाई गंगाधर धोंडे यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. गाडे साहेब यांनी




प्रास्तविकात सुभाष धोंडे यांच्या कार्याचा लेखा - जोखा मांडला. याप्रसंगी मा. आ. साहेबराव दरेकर नाना यांनी वेळेअभावी सुभाष धोंडे यांचे प्रशासकीय काम अत्यंत प्रामाणिक होते असे सांगून धोंडे यांना सेवापुर्ती निमित्त शुभेच्छा दिल्या. यावेळी ह. भ. प. झांबरे महाराज म्हणाले की, सेवा हाच मानवाचा खरा धर्म असतो. क्षेत्र कोणतेही असो सेवेचा उपयोग चांगला केला पाहिजे. आपल्या कर्मयोगाचा उपयोग चांगल्या सेवेसाठीच करा अशा उपदेश देवून सुभाष धोंडे यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

तसेच यावेळी देविदास आबा धस यांनी सांगितले की, सुभाष धोंडे हे नशिबवान आहेत कारण आजच्या त्यांच्या सेवापुर्ती सोहळ्यास माता व गुरु हे दोघेही उपस्थित आहेत. सुभाष धोंडे हे कामाचा माणूस आहेत असेही ते शेवटी म्हणाले. याप्रसंगी जनार्धन कासले सर यांनी सांगितले की, सुभाष धोंडे व माझे संबध कौटुंबिक होते. मी सुभाष यांना माझा लहान भाऊ समजत होतो. सुभाष हे कधीही चुकीचे वागलेले मी पाहिले नाही. सुभाष यांनी आता शेतीकडे लक्ष द्यावे तसेच यापुढे त्यांनी नातवाच्या शिक्षणाकडे जास्तीचे लक्ष देवून भविष्यात येणाऱ्या एआय बाबत मार्गदर्शन करावे. तसेच यावेळी त्यांनी जुनी आठवण काढत आष्टी ने मला खुप प्रेम दिले. आजही आष्टी हे मला माझे गावच वाटते हे सांगायला ते विसरले नाहीत. यावेळी प्रफुल्ल भाऊ सहस्त्रबुद्धे म्हणाले की, सुभाष धोंडे यांना मी लहानपणापासून ओळखतो. त्यांनी त्यांचे प्रशासकीय काम चांगले केलेले असून यापुढील काळात त्यांनी सामाजिक काम करावे असे शेवटी सांगितले. शेवटी अध्यक्षिय भाषणांत गटविकास अधिकारी गोकूळ बागलाणे म्हणाले की, सुभाष धोंडे हे संस्कारक्षम व सकारात्मक वागणारे व्यक्तीमत्व आहे. त्यांच्याकडे प्रामाणिक पणा तर होताच पण आमच्या प्रशासकीय कामकाजात त्यांचा सिंहाचा वाटा असायचा असे सांगून सत्कारमूर्तींनी शुभेच्छा दिल्या. यावेळी इंजि. प्रल्हाद तळेकर, अजय निंबाळकर, श्रीम. जागृती सागर धोंडे, श्रीम. माधुरी सुनिल वाघ, श्रीम. डॉ. चंद्रकला वाघ यांनी आपली मनोगते व्यक्त केली.

यावेळी पंचायत समिती आष्टी विभागा अंतर्गत सर्व अधिकारी, कर्मचारी हे उपस्थित होते. तसेच या सेवापुर्ती सोहळ्यास राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक व साहित्य क्षेत्रातील मान्यंवर तसेच मित्र परिवार, आपेष्ट, नातेवाईक, सेवा काळातील त्यांचे सर्व कार्यालयीन सोबती कर्मचारी बंधू - भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# केज येथील वक्रतुंड गणेश मंडळाच्या वतीने काशीदवाडी येथे वड, पिंपळ,उंबराच्या सीड बॉलचे रोपण, काशीदवाडी येथे वनराई बहरणार

केज/प्रतिनिधी

केज शहरातील प्रशांत नगर भागात असणारा वक्रतुंड गणेश मंडळ हा गेली सोळावर्षे आपल्या विविध कार्यक्रमातून सामाजिक सलोखा जपत आहे तसेच नैसर्गिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. सातत्याने वक्रतुंड गणेश मंडळाच्या वतीने समाज उपयोगी उपक्रम राबवले आहेत.शुक्रवार दिनांक २९ आगष्ट रोजी वक्रतुंड गणेश मंडळा च्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाला अभिवादन करून पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून वृक्षारोपण करण्यासाठी काशीदवाडी येथील डोंगरात २०० सीडबॉल चे रोपण करण्यात आले.या सीडबॉलच्या माध्यमातून वड,पिंपळ उंबर आदी पर्यावरण पूरक वृक्षांची लागवड केली गेली.यावेळी काशीदवाडी चे सरपंच महादेव जाधवर हे उपस्थित होते.या सीड बॉल च्या माध्यमातून वातावरणात ऑक्सिजनची निर्मिती करणारे व भारतभूमी तील नैसर्गिक झाडे लावण्याचा हा प्रयत्न वक्रतुंड गणेश



मंडळा च्या वतीने करण्यात आला.यावेळी बोलताना पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी सांगितले की डॉल्बी ही आपली संस्कृती नाही. त्यामुळे गणपती उत्सवात डॉल्बी वगैरे लावू नये तसेच आपली संस्कृती जपत सामाजिक बांधिलकी जपत आपला सांस्कृतिक वारसा जपला पाहिजे याचा फायदा आपल्या भागातील नागरिकांना यांचा लाभ झाला पाहिजे चांगली विचार सरणी जोपासली पाहिजे.शारीरिक, मानसिक आरोग्य जोपासले पाहिजे यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांना अभिप्रेत असणारे कार्य झाले आपल्या हातून झाले पाहिजे असे सांगितले.काशीदवाडीचे सरपंच महादेव जाधव यांनी वक्रतुंड गणेश मंडळ यांनी अतिशय चांगला उपक्रम राबवला असून लवकरच हे झाडे जोपासण्याचे काम झाल्यावर नैसर्गिक समतोल राखला जाईल आणि यासाठी आमचे गाव निवडल्या बद्दल वक्रतुंड गणेश मंडळाचे आभार मानले यावेळी प्रशांत नगर भागातील वक्रतुंड गणेश मंडळाचे सर्व युवा वर्ग उपस्थित होता.

---

# पहाडी पारगाव येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती भर पावसात मोठ्या उत्साहात साजरी

## महाराष्ट्र आधार सेनाचे संस्थापक अध्यक्ष दिपक थोरात यांची उपस्थिती

वडवणी। प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील पारगाव येथे, दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंतीनिमित्त दि.२८ ऑगस्ट २०२५ गुरुवार रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

महाराष्ट्र आधार सेनेचे संस्थापक अध्यक्ष तथा सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ चे संपादक मा.दिपकभाऊ थोरात यांच्या शुभहस्ते साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र आधार सेना चे कार्याध्यक्ष उद्धव आरे, धारूर तालुकाध्यक्ष अर्जुन पाटोळे,वडवणी तालुकाध्यक्ष सतीश हनवते,करण सरवदे,महाराष्ट्र आधार सेना वडवणी शहराध्यक्ष तथा कृष्णा मोबाईल शॉपी वडवणीचे मिलिंद पाटोळे तसेच पप्पू पाटोळे, सार्वजनिक जयंती उत्सव



समितीचे अध्यक्ष विशाल पाटोळे,उपाध्यक्ष युवराज पाटोळे,सचिव लखन पाटोळे,सहसचिव योगेश पाटोळे,मिलिंद पाटोळे,अर्जुन पाटोळे यांच्यासह सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे सर्व पदाधिकारी मान्यवर म्हणून उपस्थित होते. महाराष्ट्र आधार सेनाचे संस्थापक,अध्यक्ष दिपकभाऊ थोरात यांनी भर पावसात अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त सर्वांना संबोधित करून जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने गावातील पुरुष,महिला,तरुण मंडळी उपस्थित होते.

---

# टेंभुर्णी परिसरात मुसळधार पावसाचा कहर - शेतपिकांचे, रस्त्यांचे व घरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान

मानूर /प्रतिनिधी

दि. २८ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी सुमारे चार वाजता टेंभुर्णी गाव व परिसरात तुफान पावसाला सुरुवात झाली. रात्री उशिरा दोन वाजेपर्यंत या पावसाचा कहर वाढत गेला आणि पहाटेपर्यंत गाव व परिसरात गंभीर परिस्थिती निर्माण झाली. या मुसळधार पावसामुळे शेतातील पिकांचे नुकसान होऊन नदी,बंधारे, ओढा -नाले तुडुंब भरून वाहू लागल्याने रस्त्यांचे प्रचंड नुकसान झाले. अनेकांच्या घरामध्ये पुराचे पाणी शिरल्याने जीवनावश्यक वस्तूंचे मोठे नुकसान झाले आहे.

गावातील माता-भगिनींनी पहाटेपासूनच सरपंच मिथुन डोंगरे यांना फोन करून मदतीची आर्त हाक दिली. सरपंच डोंगरे यांनी तात्काळ प्रत्येक प्रभावित कुटुंबाची भेट घेतली. खरवंडी-टेंभुर्णी-पाथर्डी हा प्र. जि. मा. २ रस्ता पूर्णपणे पुरमय झाल्याने वाहतूक ठप्प झाली होती. विशेषत: बागवस्तीचा गावाशी पूर्ण संपर्क तुटला असून तेथील ३० ते ३५ कुटुंब मोठ्या संकटात सापडले आहेत. लहान मुलांना शाळेत जाणेदेखील अशक्य झाले आहे.बागवस्तीतील ग्रामस्थ बबन ढाकणे, बाळासाहेब शिरसाट, श्रीधर शिरसाट, प्रकाश शिरसाट, रावसाहेब शिरसाट, शाहुराव शिरसाट, गोकुळ हांगे, जालिंदर हांगे, शहादेव शिरसाट यांनी स्वखर्चाने तब्बल २ ते ३ लाख रुपये खर्च करून बांधलेला १२ नळकांड्यांचा पूल पूर्णत: वाहून गेला आहे.ही बिकट परिस्थिती पाहून सरपंच मिथुन डोंगरे यांनी तत्काळ आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघाचे आमदार सुरेश अण्णा धस व आमदार मोनिकाताई यांना कळवले. फक्त एका फोन कॉलवर आमदार सुरेश धस यांनी तातडीने मदत यंत्रणा कार्यान्वित केली. अवघ्या अर्ध्या तासातच शिरूरचे तहसीलदार सुरेशराव घोळवे आपल्या



पथकासह टेंभुर्णी येथे दाखल झाले. त्यांच्यासोबत मंडळ अधिकारी निळकंठराव सानप, तलाठी जाधव, तसेच गावातील पंच मंडळी भिमराव शिरसाट, सर्जेराव शिरसाट, हनुमंत वनवे आदी कार्यरत होते.गावकऱ्यांमध्ये दबक्या आवाजात चर्चा होती की सरपंच असावा तर असा - सुख-दु:खात सोबत उभा राहणारा, हक्काचा माणूस.दरम्यान, पाथर्डी बांधकाम विभागाचे अधिकारी श्री. एन. टी. खेडकर यांच्या टीमसह जेसीबी यंत्रणा तातडीने गावात दाखल झाली. मदत कार्यासाठी तत्काळ दाखल झाल्याबद्दल सरपंच मिथुन डोंगरे यांनी त्यांचे आभार मानले. संकट काळात दोन्हीही आमदारांनी वेळ न दवडता मदत कार्य सुरू केले याबद्दल ग्रामस्थांतर्फे त्यांचे विशेष कौतुक व्यक्त करण्यात आले.

टेंभुर्णी परिसरातील जनजीवन अद्याप विस्कळीत असून शेतकरी व ग्रामस्थांना मोठ्या प्रमाणावर नुकसान सोसावे लागत आहे. शासनाने तातडीने पंचनामे करून योग्य ती मदत द्यावी, अशी मागणी ग्रामस्थ व सरपंचांनी केली आहे.

---



# केजचे भुमीपुत्र विनोद गुंड चा जिल्हाधिकारी विवेक जान्सन यांच्या हस्ते सत्कार

केज/प्रतिनिधी

केज शहरातील भुमीपुत्र विनोद गुंड यांचा क्रिडा क्षेत्रातील योगदानाबद्दल बीडचे जिल्हाधिकारी विवेक जान्सन यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला

याबाबत सविस्तर माहिती अशी की,बीड जिल्हा क्रीडा कार्यालया च्या वतीने राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला.यावेळी बीड जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केलेल्या मान्यवर क्रीडा संघटक व क्रीडा प्रशिक्षक व क्रीडा संयोजक म्हणून कामगिरी केल्याबद्दल विनोद गुंड यांचा दि.२९ आगस्ट २०२५ रोजी राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त बीडचे जिल्हाधिकारी श्री. विवेक जॉन्सन यांच्या शुभहस्ते सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.यावेळी बीड जिल्हा क्रीडा अधिकारी श्री.अरविंद विद्यागर प्रा.जनार्दन शेळके तसेच या कार्यक्रमाला बीड जिल्ह्यातील खेळाडू व क्रीडा प्रेमी यांची उपस्थिती होती.यावेळी प्रतिनिधीशी बोलताना विनोद गुंड यांनी सांगितले की,जिल्हा

अधिकारी यांच्या कडून आपला सन्मान झाला याबद्दल प्रशासनाला धन्यवाद देतो तसेच या मुळे क्रीडा क्षेत्रात अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळाली आहे असे त्यांनी सांगितले आहे.

---

# भरपावसात खा.बजरंग सोनवणे मनोज जरांगे यांच्या भेटीला,मराठा आरक्षणाला दिला जाहीर पाठिंबा; पाठिंबा देणारे राज्यातील पहिले लोकप्रतिनिधी

बीड/प्रतिनिधी

मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील शुक्रवार दिनांक २९ आगष्ट २०२५ रोजी आझाद मैदानावर उपोषणाला बसले आहेत.यावेळी भर पावसात खा.बजरंग सोनवणे यांनी मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली.यावेळी मराठा आरक्षण लढ्याला जाहीर पाठिंबा दिला. आपण दादासोबत आहोत अशी प्रतिक्रिया देखील त्यांनी यावेळी माध्यमाना दिली.

मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात मुंबईत मराठा आरक्षण आंदोलन सुरु झाले आहे.दोन दिवसांपासून राज्यातील मराठा आंदोलक मुंबईत दाखल झाले आहेत. दि.२९ रोजी आझाद मैदानात मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सुरू झाले आहे. दरम्यान सकाळ पासून जोरदार



पाऊस सुरू आहे.परंतु पडत्या पावसात मराठा समाज रस्त्यावर आहे. खा.बजरंग सोनवणे यांनी देखील पडत्या पावसात आझाद मैदानात जाऊन मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली.यावेळी त्यांनी जरांगे पाटील यांनी केलेल्या सर्व मागण्या सरकारने मान्य कराव्यात अशी मागणी देखीलकेली.खा.बजरंग सोनवणे यांनी सर्वात पहिली भेट दिली.खा. बजरंग सोनवणे मैदानात येताच मराठा समाजाने त्यांचे प्रचंड जल्लोषातत्यांचे स्वागत केले.आंदोलनाला राज्यातील भेट देणारे पहिले लोकप्रतिनिधी ठरले आहेत.खासदार बजरंग सोनवणे यांनी उघड भूमिका घेतली असून मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या सर्व मागण्या मान्य कराव्यात अशी मागणी केली आहे.

---

# ॲड .नरसिह जाधव यांच्या वतीने पाटोदा वकील संघाला कायद्यांच्या पुस्तकांचा संच भेट

पाटोदा /प्रतिनिधी

पाटोद्याचे भूमिपुत्र व छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालयात कार्यरत असणारे ज्येष्ठ विधीज्ञ ड नरसिंह जाधव यांच्या वतीने शुक्रवार रोजी पाटोदा वकील संघाला कायदेविषयक माहिती पुस्तकाचा संच भेट देण्यात आला. एडवोकेट नरसिंह जाधव हे पाटोद्याचे भूमिपुत्र असून सध्या छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालयात कार्यरत आहेत पाटोदा न्यायालयात कार्यरत असणाऱ्या वकील बांधवांसाठी त्याचप्रमाणे ज्युनिअर वकील बांधवांसाठी अत्यावश्यक असणारे विविध प्रकारच्या कायद्याची माहिती पुस्तकांचा संच जाधव यांच्या वतीने पाटोदा वकील संघाला भेट देण्यात



आला यामध्ये महिलांविषयी कायदे, भारतीय साक्ष अधिनियम २०२३, शस्त्रास्त्र कायदा , अमली पदार्थ बंदी विरोधी कायदा, महाराष्ट्र गाव पंचायत कायदा, महाराष्ट्र महानगरपालिका नगरपंचायत औद्योगिक कायदे, वक्फ बोर्ड कायदा , भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३, विवाह कायदा १९५४, मुस्लिम कायदा, हिंदू वारसा हक्क कायदा १९५६, बाल लंगिक अत्याचार विरोधी कायदा , डी.व्ही. कायदे, भूसंपादन कायदेविषयक माहिती पुस्तक, त्याचप्रमाणे अत्यावश्यक असणाऱ्या सर्व कायद्यान विषयी माहितीची पुस्तकांचा मोठा संच एडवोकेट नरसिंह जाधव यांच्या वतीने पाटोदा वकील संघाला भेट देण्यात आला यावेळी पाटोदा वकील संघाचे अध्यक्ष एडवोकेट बी. आर .लवुळ , एडवोकेट सुशील कोठेकर, उपाध्यक्ष एडवोकेट जब्बार पठाण ज्येष्ठ विधीज्ञ ड एम व्ही जाधव , एडवोकेट सय्यद आशरफ, एडवोकेट चंदन कांकरिया, एडवोकेट ऋषिकेश डबीर, एडवोकेट सचिन जावळे, एडवोकेट पूनम शहाणे, एडवोट तळेकर एडवोकेट आर. एस. घुले एडवोकेट कोल्हे एडवोकेट सुधीर घुमरे एडवोकेट जगदाळे ड महेश बेदरे

## पुल ओलांडताना रिक्षा वाहून गेला चालकाचा शोध लागेना

प्रतिनिधी।धारूर

तालुक्यात बुधवारी रात्री झालेल्या अतिवृष्टीमुळे वाण नदीला पूर आला होता . धारूर आडस रस्त्यावर -आवरगाव येथील पुलावरून रिक्षा वाहून गेल्याने चालक बेपत्ता झाला होता .नातेवाईकासह प्रशासनाने दुसऱ्या दिवशी शुक्रवारी ही शोध मोहीम राबविण्यात आली परंतु रिक्षा चालकाचा मृतदेह सापडला नाही .

तालुक्यात दोन दिवसापासून मुसळधार पाऊस सुरू आहे. तांदळवाडी धरण भरून वाहत असून त्यामुळे आवरगाव व अंजनडोह येथील पूल पाण्याखाली गेले आहेत. बुधवारी रात्री रुईधारुरहून अंजनडोहकडे जाताना रात्री आडत व्यापारी नितिन शिवाजीराव कांबळे यांची कार पुलावरून वाहून गेली. प्रशासन, पोलीस यांना गुरुवारी सकाळी सहा वाजता पुलापासून एक किलोमीटर अंतरावर कांबळे यांच्या मृतदेहाचा शोध लागला .कार मात्र तिसऱ्या दिवशीही सापडली नाही .

धारूर आडस रस्त्यावरील आवरगाव पुलावरून अनिल बाबूराव लोखंडे हा रिक्षा चालक रिक्षा सह वाहून गेला होता .मात्र रिक्षा चालक बेपत्ता झाला होता . बेपत्ता झाल्यानंतर दुसऱ्या दिवशीपासून प्रशासनाची शोध मोहीम सुरू आहे .प्रशासनाने शुक्रवारी नदीपात्रात त्याचा ड्रोन कॅमेऱ्याच्या साह्याने शोध घेतला . मात्र तो आढळून आला नाही .शुक्रवारी नायब तहसीलदार शरद पाळवदे , पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे , अव्वल कारकून पी . एल . गोपड यांच्यासह कर्मचारी दिवसभर ठाण मांडून होते .नातेवाईकही पुलावर ठाण मांडून होते .परंतु रिक्षा चालक अनिल लोखंडे याचा शोध लावण्यात अपयश आले



बीड - श्रीसंत शिरोमणी मन्मथ स्वामी संजीवन समाधी क्षेत्र कपिलधार येथे साक्षात नागनाथ महाराजांनी शुक्रवार दिनांक २९ ऑगस्ट रोजी भक्तांना दर्शन दिले.

# मुस्लिम वेल्फेअर ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी हाजी रहेमत खान यांची नियुक्ती

### माजी आमदार सुरेशकुमार जेथलिया यांचे विश्वासू हाजी रहेमतखान यांना राष्ट्रीय अध्यक्ष सलीम सागर यांच्या हस्ते ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती पत्र देऊन सन्मान

परतूर प्रतिनिधी

ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी हाजी रहेमतखान मुस्लिम वेल्फेअर ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते हाजी रहेमतखॉन (रा. आष्टी ता. परतूर यांची निवड करण्यात आली. मुस्लिम वेल्फेअर असोसिएशनच्या ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली या नवी मुंबई येथे राष्ट्रवादी अजितदादा गटाच्या मुस्लिम वेल्फेअर असोसिएशनची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती या बैठकीचे अध्यक्षस्थान असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष सलीम सागर यांनी केली होती या बैठकीत जिल्हा पदाधिकाऱ्यांची फेरबदल व नव्या जबाबदाऱ्याची वाटप करण्यात आले यावेळी समाजसेवक हाजी रहेमत खान काकड ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली तसेच कोरोना काळात त्यांनी सामाजिक कार्य केले. याशिवाय नेहमीच रक्तदान शिबीर घेतात. तर सामाजिक उपक्रमात सहभागी होऊन योगदान देतात. सामाजिक कामाची दखल घेऊन त्यांची निवड करण्यात आली. आहे तसेच रहेमतखान युसुफखान पठाण यांची जालना जिल्हाध्यक्ष ग्रामीण पदी नियुक्ती करण्यात आली. त्यांना मुस्लिम वेल्फेअर असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष सलीम सारंग यांच्या हस्ते नियुक्ती प्रमाणात देण्यात आले. यावेळी हाजी रहेमत खान बोलताना म्हणाली की माझ्याबद्दल घेतलेला



निर्णय ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी मी मुस्लिम समाजाबद्दल वंचित राहिलेले नागरिक व त्यांचा प्रश्न कसा मार्गी लावा यावर मी प्रयत्न करणार तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते माजी आमदार सुरेश कुमार जेथलिया राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस नितीन कुमार जेथलिया तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष व सर्व जिल्ह्याचे कार्यकर्ते यांचा मी आभार व्यक्त करतो जे त्यांनी वेडा वेळी मला सहकार्य करून मला भेटलेली पदा साठी शुभेच्छा दिले साजिद शेख, इमरान शेख, अब्दुल शेख, महेबुब शेख, उस्मान शेख, साबेरमिया मनियार, आसदखॉ काकड, वशिम शेख, नवीद शेख, मोहसीन बागवान आदींची उपस्थिती होती.

# माटेगावात दारुबंदीचा ग्रामपंचायतचा ठराव

### सरपंच सौ शितल आरबड यांनी घेतला पुढाकार

गेवराई (प्रतिनिधी) गेवराई तालुक्यातील मौजे माटेगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. शितल ज्ञानेश्वर आरबड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत माटेगाव येथे दारु विक्री व दारुबंदी करण्यात आली आहे. दरम्यान ग्रामपंचायतने घेतलेल्या निर्णयाचे परिसरात स्वागत करण्यात येत आहे.



याबाबत सविस्तर माहिती अशी की, माटेगाव येथे जि.प.शाळा, मंदिर व बसस्थानक परिसरात अवैध दारू विक्रीमुळे लोक व्यसनाधीन होऊन सार्वजनिक शांतता भंग होत असुन शाळेतील मुला-मुलींना व महिलांना त्रास होत असल्यामुळे दारुबंदीसाठी सरपंच सौ. शितल ज्ञानेश्वर आरबड यांनी पुढाकार घेतला. दिनांक २२ फेब्रुवारी रोजी सरपंच सौ. शितल आरबड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ग्रामसभेत दारुबंदीचा ठराव घेण्यात आला. यावेळी शरद आश्राजी शिंदे यांनी सभेत विषय मांडला की, मौजे माटेगाव मध्ये व परिसरात अवैध दारू विक्री गावातील शाळा, मंदिर व बसस्थानक या परीसरात होत असल्यामुळे शाळेतील मुला मुलींना व गावातील महिलांना यामुळे त्रास होत आहे. तसेच अवैध दारू विक्री व मद्यपानामुळे लोक व्यसनाधीन होऊन गावामध्ये खालील समस्या निर्माण झाल्या आहेत आहेत. गावातील अवैध दारू विक्री कायमची बंद झाल्यास मद्यपाणामुळे होणारे दुष्परिणाम टाळता येतील. यावर उपस्थित सरपंच, उपसरपंच व सर्व ग्रामस्थ यांच्यात सविस्तर चर्चा होऊन ठराव सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात आला. यावेळी सरपंच सौ शितल आरबड, उपसरपंच

सौ. गिता शहादेव यादव, ज्ञानेश्वर आरबड, ग्रामसेवक पी.आर. घाडगे यांच्यासह सर्व ग्रामपंचात सदस्य उपस्थित होते.ग्रामपंचायतच्या वतीने दारुबंदी ठराव व निवेदन चकलंबा पोलिस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक संदिप पाटील यांना देण्यात आले असून माटेगाव ग्रामपंचायतने घेतलेल्या निर्णयाचे परिसरात स्वागत केले जात आहे. यावेळी महादेव कर्डिले भागवत जंगले, योगेश गावडे, अजय टेकाळे, अभिजीत चव्हाण, अर्जुन घाडगे, हकिम शेख, सचिन जाधव दादासाहेब यादव,विक्रम गरुड, गोविंदराव चहाण, सुरेश कदम यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जि.प.कन्याप्रशाला गेवराई येथे इंटेन्सिफाईड अवरनेस कॅम्पेन सपन्न

गेवराई तालुक्यात महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था मुंबई यांच्या मार्गदर्शक सुचनेनुसार जिल्हा एड्स नियंत्रण व प्रतिबंधक कक्ष बीड आणि आय.सि.टी.सी विभाग उपजिल्हा रुग्णालय गेवराई यांच्या संयुक्त विद्यमाने इंटेन्सिफाईड अवरनेस कॅम्पेन अंतर्गत दि.२५/८/२५ रोजी जिल्हा परिषद कन्या प्रशालेत घेण्यात आले.

किशोर वयातील मुलींच्या आरोग्य विषयक तक्रारी यावर उपजिल्हा रुग्णालया गेवराई येथीलआयसिटीसी समुपदेशक

श्री.सुनिल सरवदे आणि श्री.विक्रम तिडके आयटीसी प्रयोगशाळा तज्ञ यांनी योग्य समुपदेशन केले तसेच एच.आय.व्ही /एड्स या विषयावर मोलाचे मार्गदर्शन करून मोफत उपचारा विषयक टोल फ्री नंबर १०९७ आणि २०१७ विषयी माहिती दिली.




या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री.सोळुकेसर यांनी शरीर आपली संपत्ती आहे त्याची निगा आणि आरोग्य विषयक काळजी वेळीच घेतली पाहिजे अंगावर दुखणं न काढता न लाजता आपल्या आरोग्या विषयी जागरूक राहीलं पाहिजे.

शासनाच्या आरोग्याविषयी अनेक वैद्यकीय योजना आगदी मोफत आहेत त्याचा फायदा आपन घ्यायला पाहिजे असे आवाहन किशोरवयीन विद्यार्थीनींना केले. या आरोग्य विषयक कार्यक्रमासाठी ब्युटी आणि हेल्थ च्या मयुरी भंडारे मॅडम कोमल कांबळे मॅडम सह शाळेतील जेष्ठ शिक्षीका श्रीमती चोपडे मॅडम, शिंदे मॅडम, प्रतिक्षा मॅडम सह सर्व महिला शिक्षक भगीणी उपस्थित होत्या

# प्रियदर्शनी क्रीडा, सांस्कृतिक व व्यायाम मंडळाच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त भव्य ढोल ताशा पथक स्पर्धेचे आयोजन

### शहरातील जास्तीत जास्त गणेश मंडळांच्या ढोल ताशा पथकांनी स्पर्धेत सहभागी व्हावे - संकेत राजकिशोर मोदी

अंबाजोगाई (प्रतिनिधी):- अंबाजोगाई शहरातील प्रियदर्शनी क्रीडा, सांस्कृतिक व व्यायाम मंडळाच्या वतीने गणेशोत्सवा निमित्ताने ढोलताशा पथकांच्या भव्य अशा खुल्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहेत .या ढोलताशा पथक स्पर्धेमध्ये शहरातील जास्तीत जास्त ढोलपथक संघांनी सहभागी व्हावे असे आवाहन संयोजक संकेत राजकिशोर मोदी यांनी केले आहे. ही स्पर्धा बुधवार दि ३ सप्टेंबर २०२५ रोजी शंकर महाराज वंजारी वसतिगृहाच्या मैदानात दुपारी एक वाजता संपन्न होतील असेही संकेत मोदी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे जाहीर केले आहे.

स्पर्धेतील यशस्वी संघांना भरघोस रोख रक्कम तसेच सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित देखील करण्यात येणार आहे. या स्पर्धेचे यंदाचे हे तिसरे वर्ष आहे.

संकेत मोदी हे अंबाजोगाई शहर व मोदी कुटुंबाची सांस्कृतिक व शैक्षणिक परंपरा मोठ्या जोमाने व उत्साहाने पुढे नेत आहेत. अंबाजोगाई शहरात ते अनेक वेळा वेगवेगळे शैक्षणिक तसेच सांस्कृतिक उपक्रम राबवून शहरातील विद्यार्थी, कलावंत आदींना एक व्यासपीठ उपलब्ध करून देत आहेत. त्यामुळे ते शहरातील तरुणाईच्या मनामनात आपले स्थान निर्माण करण्यात यशस्वी होत आहेत.

त्याचबरोबर राजकिशोर मोदी यांच्या माध्यमातून प्रियदर्शनी क्रीडा मंडळ हे मागील ३५ वर्षांपासून शहरात विविध क्रीडा, सांस्कृतिक , शैक्षणिक कार्यक्रम आयोजित करत आहे. अंबाजोगाई शहरात १०० च्या जवळपास गणेश मंडळ कार्यरत आहेत. यावर्षी सलग तिसऱ्यांदा या गणेश मंडळासाठी संकेत मोदी यांच्या संकल्पनेतून शहरातील गणेशोत्सवानिमित्त ढोल ताशा पथकांच्या भव्य अशा खुल्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत




प्रथम क्रमांक रुपये ३१००१/-, द्वितीय क्रमांक रुपये २१००१/- , तृतीय क्रमांक रुपये १५००१/-, चतुर्थ क्रमांक रुपये ७००१/- तर उत्तेजनार्थ रुपये ५००१/- अशा बक्षिसांची लयलूट प्रियदर्शनी क्रीडा मंडळाच्या वतीने करण्यात आली आहे. तेव्हा या स्पर्धेत शहरातील जास्तीत जास्त गणेश मंडळाच्या ढोल ताशा पथकांनी आपला सहभाग नोंदवावा असे अवाहन संकेत मोदी यांच्या वतीने करण्यात येत आहे. प्रियदर्शनी क्रिडा व सांस्कृतिक मंडळाच्या वतीने मागील ३५ वर्षांपासून अंबाजोगाई तालुक्यातील शालेय विद्यार्थ्यांसाठी बाल झुंबडचे आयोजन देखील करण्यात येत आहे तसेच स्वा रा ती रुग्णालयातील रुग्णांसाठी भव्य असे रक्तदान शिबीर, त्याचबरोबर दीपावली निमित्त रुग्णांना फराळ वाटपाचा कार्यक्रमही आयोजित करण्यात येऊन रुग्णांच्या चेहऱ्यावर हसू फुलवण्याचे काम राजकिशोर मोदी तथा संकेत मोदी यांच्या माध्यमातून करण्यात येत असते.

गणेशोत्सवा निमित्ताने आयोजित खुल्या ढोल ताशा वाद्य स्पर्धेत सहभागी होण्यासाठी सचिन जाधव ९९७५१७१९४४ , दत्ता सरवदे ९८९००४१००६, महेश कदम ९९७०१०५८५९, रोहन कुरे ,९०२८९९१०००, शुभम लखेरा ८६००६३४६००, सुशील जोशी ९८९०९ ४७८४७, शरद काळे ७६६६९३३७१७, अस्लम शेख ९६६५७४८४७५ यांच्याशी दि २ सप्टेंबर २०२५ दुपारी २ वाजेपर्यंत संपर्क साधावा असे आवाहन संकेत राजकिशोर मोदी यांच्या वतीने करण्यात येत आहे. नियम , अटी व अंतिम निकाल हा मंडळाच्या परिक्षकाकडेच राहील व तो अंतिम व अबाधित राहील.

# शशीकांत नवागिरे सर राष्ट्रीय भारत भूषण पुरस्काराने सन्मानित

प्रतिनिधी । बीड

राष्ट्रीय भारत भूषण पुरस्कार सोहळा नुकताच पुण्यात आयोजित करण्यात आला होता यात महाराष्ट्राच्या हितासाठी सर्वाच्या सेवेसाठी कार्यरत असलेल्या साई ज्योती सामाजिक फाउंडेशन यांच्या वतीने सामाजिक चळवळीच्या मानबिंदू राष्ट्रीय भारत भूषण पुरस्कार वितरण सोहळा नुकताच भारत इतिहास संशोधन मंडळ सदाशिव पेठ पुणे येथे पार पडला श्री शशिकांत शाहुराव नवगिरे हे ग्रामीण भागातील असून यांनी समाजात नाळ जोडली तसेच यांनी कराटे मार्शल आर्ट तसेच सी आय डी डी सुराग गुफिया जासूस विभाग तसेच विविध क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी करून त्यांनी आपला वेगळा ठसा



उमटविला अनेक ठिकाणी कराटे प्रशिक्षण मुलांना देऊन मुलं व मुली स्वसंरक्षण कलेमध्ये निपुण केले तसेच त्यांचे विद्यार्थीनी व विद्यार्थी अनेक ठिकाणी शासकिय सेवेत आहेत तसेच शिवशक्ती मार्शल आर्ट अकॅडमी मध्ये ते बरेच दिवस काम करत आहेत गोरगरीब विद्यार्थ्यांना शिवशक्ती अकॅडमी तर्फे खुप सहकार्य करतांना दिसत आहेत तसेच सामाजिक क्षेत्रामध्ये नवगिरे सर यांचे खुप मोठे कार्य आहे आणि शाळे वरती जाऊन त्यांनी विद्यार्थी घडवले आहेत अनेक विद्यार्थ्यांचा आणि शारीरिक व मानसिक विकास करून त्यांच्यामध्ये चांगल्यापैकी प्रगती केली आहे नवगिरे सर यांनी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रामध्ये चांगली कामगिरी केली आहे नवघरे सर यांनी यासाठी खूप संघर्षमय जीवन या क्षेत्रामध्ये घालवले आहे या सर्व गोष्टीचा विचार करून श्री शशिकांत शाहूराव नवगिरे यांना हा राष्ट्रीय भारत भूषण पुरस्काराने गौरविण्यात आले आहे साई ज्योती फाउंडेशन महाराष्ट्र यांच्या वतीने राष्ट्रीय भारत भूषण पुरस्कार यांना देण्यात आला यावेळी या सोहळ्यात प्रबोधनकार सचिन देवरे प्रमुख व्याख्याते म्हणून उपस्थित होते तर हिने अभिनेत्री भक्ती साधू मुंबई बॉलीवूड अभिनेत्री चित्रा दीक्षित मुंबई यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला या कार्यक्रमाचे उद्घाटक पुणे शहर पोलीस उपनिरीक्षक माननीय श्री विष्णू देशमुख हे होते

# पतीकडून पत्नीचा निर्घृण खून - सात ते आठ वारांनी घेतला जीव, दोन चिमुकल्यांचे संसार उद्ध्वस्त

प्रतिनिधी । जिंतुर

जिंतूर तालुक्यातील सोनापुर तांडा येथे कौटुंबिक वादातून घडलेली घटना सर्वांना हादरवून टाकणारी आहे. पत्नीवरच पतीने धारदार शस्त्राने सात ते आठ वार करत निर्घृण खून केल्याची घटना २८ ऑगस्ट दुपारी साडेतीन च्या सुमारास घडली आहे.मृत महिलेचे नाव विद्या विजय राठोड (वय ३२) असून ती मूळची सोनापुर तांडा येथील रहिवासी आहे. तिचा विवाह वाघी (ता. जिंतूर) येथील विजय राठोड यांच्याशी झाला होता. पती-पत्नीमध्ये सतत वाद होत असल्याने विद्या माहेरी आली होती. मात्र २८ आगस्ट दुपारी साडेतीन च्या सुमारास तिच्या वडिलांच्या



शेतातच पती-पत्नीमध्ये शाब्दिक चकमक झाली. वादाच्या भरात विजय राठोड याने हातातील धारदार तीक्ष्ण हत्यारांने पत्नीच्या छाती, पोट, पाठीवर व हातावर जबर हल्ला केला.

विद्याला तातडीने ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले, पण वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रमोद पारवे यांनी तिला तपासून मृत घोषित केले. रुग्णालयात भर पावसात नातेवाईकांचा आक्रोश उसळला. मृतकाला दोन लहान मुले असून आईच्या छत्रछायेशिवाय त्यांचे भवितव्य अंधारमय झाले आहे.दरम्यान, घटनेनंतरही रुग्णालयात एकही पोलिस कर्मचारी वेळेत पोहोचला नाही, याबद्दल ग्रामस्थांत संताप पसरला आहे. गावात आता विद्याच्या खुनाचा आरोपी पतीला तात्काळ अटक करावी अशी जोरदार मागणी होत आहे.